वर्ष ९ वें अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९५८

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

१९५८

हे प्रकृति, हे पृथ्वी माते, तूं म्हटलें आहेस कीं, तूं सहकार्य देशील; आणि या सहकार्याच्या समृद्धीला सीमा नाहीं.

-- श्रीमाताजी

वर्ष ९ अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९५८

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

### श्रीमाताजींचा ८० वा जन्मदिन-विशेष अंक



संपादक :

भालचंद्र लिमये

संजीवन कार्यालय

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

**वार्षिक वर्गणी-यथाशक्ति**

संपादक——भालचंद्र लिमये.
प्रकाशक——'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक——श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
58/58/1/1000

# २१ फेब्रुवारी १९५८

## श्रीमाताजींविषयीं

श्रीमाताजींची चेतना ही दिव्यचेतना आहे आणि तिच्यामधून निघणारा प्रकाश हा दिव्य-सत्याचा प्रकाश आहे. जो मनुष्य श्रीमाताजींचा प्रकाश ग्रहण करतो, स्वीकारतो व त्या प्रकाशांत जीवन जगतो, त्याला मनोमय, प्राणमय, अन्नमय इत्यादि सर्व पातळींवर सत्यदर्शन घडूं लागतें. जें जें अदिव्य असेल त्या सर्वांचा तो त्याग करतो;——अदिव्य म्हणजे, असत्य, अज्ञान आणि दुष्ट शक्तींच्या प्रभावानें घडलेले प्रमाद; दिव्यसत्य, त्याचा प्रकाश व त्याची शक्ति यांचा स्वीकार करण्यास जें जें कांहीं नाखूष असतें, व जें जें अंधःकारपूर्ण असतें ते सर्व अदिव्य होय. म्हणून जें जें कांहीं, श्रीमाताजींचा प्रकाश व प्रभाव स्वीकारण्यास तयार नसतें तें तें सर्वच अदिव्य होय. श्रीमाताजी व त्यांचा प्रकाश आणि शक्ति यांच्याशीं सतत संलग्न रहा असें मी नेहमीं सांगत असतो तें यासाठींच; कारण असें केल्यानेंच केवळ, तूं या गोंधळांतून व अंधःकारांतून बाहेर येऊं शकशील आणि ऊर्ध्व दिशेनें खालीं अवतरणाऱ्या सत्याचा स्वीकार करूं शकशील.

जेव्हां कांहीं विशेष अर्थानें आम्ही श्रीमाताजींचा प्रकाश किंवा माझा प्रकाश असा उल्लेख करतो, तेव्हां तो त्याच्या विशेष गूढ क्रियेसंबंधीं असतो——अतिमानसापासून आलेल्या कांहीं विशेष प्रकाशांसंबंधीं आम्ही बोलत असतो. ह्या क्रियेमध्यें श्रीमाताजींचा प्रकाश शुभ्र असतो; तो शुद्धीकरण करतो, उज्वलित करतो, सत्याचा संपूर्ण गाभा आणि शक्ति तो खालीं आणतो आणि रूपांतर शक्य करतो. पण वास्तविक वरून उच्चतम, दिव्य सत्यापासून येणारा सर्वच प्रकाश श्रीमाताजींचा असतो.

श्रीमाताजींचा मार्ग व माझा मार्ग असा फरक मुळींच नाहीं; दिव्य अनुभूति आणि अतिमानस परिवर्तन यांकडे नेणारा आमचा दोघांचा मार्ग पूर्वीपासूनच एकच होता व आहेहि; अखेरीच केवळ नव्हे, तर अगदीं प्रथमपासूनच दोघांचे मार्ग अभिन्न, एकच आहेत.

——श्रीअरविंद

CWSA - The Mother with the letters on the Mother : Page 80

*

नित्य परिवर्तनशील देहाचा जन्मोत्सव साजरा करण्यानें कांहीं श्रद्धायुक्त भावनांचें समाधान होऊं शकेल.

शाश्वत चेतनेचा आविष्कार-उत्सव विश्वाच्या इतिहासांतील प्रत्येक क्षणीं साजरा करतां येणें शक्य आहे.

परंतु नूतन जगताचा, अतिमानस जगताचा, आगमन-उत्सव साजरा करायला मिळणें हें एक अद्‌भुत आणि असामान्य भाग्य आहे.

——श्रीमाताजी

# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना | श्रीमाताजी | ५ |
| २ श्रीमाताजी——स्वतःविषयीं | ,, | ८ |
| ३ श्रीमाताजींची घोषणा | ,, | १० |
| ४ श्रीमाताजींचीं प्रवचनें | ,, | ११ |
| (१) नव-वर्ष संदेश | | ११ |
| (२) एक साहस | | १३ |
| (३) विचार——एक निर्माणकारी शक्ति | | १४ |
| (४) वैराग्य | | १५ |
| (५) झाडांवरील भुतें | | १७ |
| (६) वनस्पतींमधील आकांक्षा | | १९ |
| ५ श्रीमातेचें साह्य | श्रीअरविंद | २० |
| ६ दूरदर्शीपणा (विद्यार्थ्यांसाठीं) | श्रीमाताजी | २३ |
| ७ निसर्गाचीं तीन पावलें (पुढें चालू) | श्रीअरविंद | २६ |
| ८ अंतस्थ दिव्यमाता | श्रीमाताजी | ३१ |
| ९ दुर्गा-स्तोत्र | श्रीअरविंद | ३१ |
| १० श्रद्धा आणि शक्ति | ,, | ३३ |
| ११ श्रीमातृशक्ति | ,, | ३५ |
| १२ आगमन | ,, | ३६ |
| १३ वाचकांचे प्रश्न | रेवान् | ३७ |
| १४ साहित्य-सत्कार | | ४१ |

# श्रीमाताजींचें हस्ताक्षर

१. संस्कृत-ईशोपनिषद् व श्रीमाताजींनीं केलेला
त्याचा फ्रेंच अनुवाद

२. जपानी

३. हिब्रू

# ईशावास्योपनिषत्

हरिः ॐ।

ईशा वास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।
au Seigneur pour qu'il l'habite, tout ceci et chaque chose univers se mouvant dans l'universel mouvement

तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम्॥१॥
de tout cela détache toi et jouis - en aucun bien (ne convoite pas) qui s'approprient les hommes ne convoite .

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः।
faisant certes ici les oeuvres ici on doit désirer vivre cent ans

एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥२॥
ainsi pour toi et non autrement en est-il l'action n'englue pas l'homme.

असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः।
sans soleil s'appellent ces mondes enveloppés de ténèbres aveugles

तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चाऽऽत्महनो जनाः॥३॥
où d'ici partis vont ~~ceux~~ qui assassinent leur âme gens

अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत्।
L'Unique sans mouvement ~~[illegible]~~ que l'esprit plus prompt les dieux mêmes ne peuvent l'atteindre dans sa progression en avant

तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति॥४॥
cela dans sa stabilité dépasse tous les autres qui courent En cela les eaux Matarisvan établit

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके।
cela est en mouvement cela est sans mouvement cela est lointain cela aussi est proche —

तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥५॥

*cela au dedans de ce tout cela aussi hors de ce tout est*

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।

*Mais celui qui partout [les devenirs] dans l'Être perçoit*

सर्वभूतेषु चाऽऽत्मानं ततो विजुगुप्सते ॥६॥

*tous les devenirs et dans l'être celui-là ne se replie plus*

यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।

*Pour qui sont toutes les choses devenues l'Être même est devenu pour qui sait*

तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥७॥

*~~[illegible]~~ qui ni douleur ou ~~[illegible]~~ ; Unité ~~[illegible]~~ perçoit*

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।

*Lui s'est diffusé, lumineux, incorporel, sans défaut, sans organes, pur, inaltéré du mal.*

कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथातथ्यतोऽर्थान्व्यदधा-

*Le Voyant, le Penseur, celui qui devient tout, qui existe en soi, a ordonné les choses selon*

-च्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥८॥

*leur loi depuis les âges infinis*

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।

*En d'aveugles ténèbres entrent ceux qui à l'ignorance se vouent*

ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥९॥

*Et comme en plus de ténèbres ceux qui à la connaissance sont adonnés.*

अन्यदेवाहुर्विद्ययाऽन्यदाहुरविद्यया ।

*Bien autre chose a-t-il été dit par la connaissance, bien autre chose a-t-il été dit par l'ignorance*

इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥१०॥
*Ainsi avons-nous appris des sages qui nous ont cela révélé.*

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳ सह ।
*Connaissance et ignorance celui qui cela connaît comme les deux à la fois*

अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥११॥
*Par l'ignorance la mort ayant franchi par la connaissance de l'immortalité jouit.*

अन्धं तमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते ।
*En d'aveugles ténèbres entrent ceux qui au non devenir se vouent*

ततो भूय इव ते तमो य उ संभूत्याꣳ रताः ॥१२॥
*Et comme en plus de ténèbres ceux qui au devenir sont adonnés*

अन्यदेवाऽऽहुः संभवादन्यदाहुरसंभवात् ।
*Bien autre chose a-t-il été dit par le devenir bien autre chose a-t-il été dit par le non-devenir*

इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥१३॥
*Ainsi avons-nous appris des sages qui nous ont cela révélé*

संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयꣳ सह ।
*Devenir et dissolution celui qui cela connaît comme les deux à la fois*

विनाशेन मृत्युं तीर्त्वा संभूत्याऽमृतमश्नुते ॥१४॥
*par la dissolution la mort ayant franchi par le devenir de l'immortalité jouit*

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
*de la Vérité*

तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥१५॥
*Cela toi ôte le [illegible] pour la loi de la Vérité pour la vision*

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन्समूह ।
Evoluteur unique Rishi Recteur Illuminateur Fils de Père des existences dispose rassemble

तेजो यत्ते रूपं कल्याणतम तत्ते पश्यामि योऽ
le Lustre de toi la forme la plus bénie ce que de toi je perçois qui

सावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥१६॥
celui-là partout a Purusha ~~[illegible]~~ lui je le suis

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्त शरीरम् ।
Souffle halaine immortelle voici

ॐ क्रतो स्मर कृतꣳ स्मर क्रतो स्मर कृतꣳ स्मर ॥१७॥
Om Pouvoir de faire souviens-toi de ce qui a été fait souviens-toi Pouvoir de faire souviens-toi de ce qui a été fait souviens-toi

अग्ने नय सुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि
Agni par la bonne voie à la félicité conduis-nous ô Dieu toutes les manifestations

विद्वान् ।
qui connaît

युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥१८॥
éloignement à toi notre plus entière parole de soumission nous offrons

इत्युपनिषद् ॥ इति वाजसनेयसंहितोपनिषत्संपूर्णा ॥

ॐ पूर्णमदः ० शिष्यते ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

---

寒（サム）暖（アタタ）笑（ワラ）答（コタエ）知（シ）高（タカ）風（カゼ）吹（フ）強（ツヨ）糸（イト）

喜（ヨロコ）歌（ウタ）雲（クモ）天（テン）話（ハナシ）書（カ）讀（ヨ）桃（モモ）流（ナガ）男（オトコ）

力（チカラ）猿（サル）雉（キジ）外（ホカ・ソト）内（ウチ）恐（オソ）第（ダイ）居（イ・オリ）松（マツ）林（ハヤシ）

花（ハナ）原（ハラ）貞（テイ）壽（ジュ）金（キン・カネ）物（モノ）町（マチ）習（ナラ）次（ツギ）音（オン）

圖（ズ）多（オウ）皆（ミナ）魚（ウオ）鯉（コイ）頭（アタマ）正（タダ）蟲（ムシ）食（タベ）形（カタチ）

池（イケ）供（トモ）村（ムラ）丸（マル）紙（カミ）神（カミ）岡（オカ）。河（カワ）銀（ギン）青（アオ）

先月（センゲツ）、着物（キモノ）　自分（ジブン）　一羽（イチワ）　何羽（ナンバ）

十羽（ジッパ）　太郎（タロウ）　天子（テンシ）　野原（ノハラ）　貞童（テイドウ）

壽男（ジュナン）　内地（ナイチ）　大勢（オウゼイ）　學ぶ（マナブ）　とって食（ク）い

平假名（ヒラガナ）　片假名（カタカナ）　交り文（マジブン）　五十音圖（ゴジウオンズ）　朝鮮（チヨウセン）

臺灣（タイワン）　半分（ハンブン）　目盛（メモリ）　反物（タンモノ）　農家（ノウカ）

時節（ジセツ）　小馬（コウマ）　田植（タウエ）　汽船（キセン）　方角（ホウガク）

| | | | |
|---|---|---|---|
| א | aleph | a | 1 |
| ב | beth | b | 2 |
| ג | ghimel | g gh. | 3 |
| ד | daleth | d | 4 |
| ה | hè | e hè | 5 |
| ו | waw | v ou u | 6 |
| ז | zaïn | z | 7 |
| ח | heth | H hè ch | 8 |
| ט | teth | t | 9 |
| י | iod | i | 10 |
| כ ך | caph | kh | 20 |
| ל | lamed | l | 30 |
| מ ם | mèm | m | 40 |
| נ ן | noun | n | [illegible] |
| ס | sameck | s | 60 |
| ע | haïn | ho wh | 70 |
| פ ף | phè | ph f | 80 |
| צ ץ | tzad | tz | 90 |
| ק | coph | c k q | 100 |
| ר | resch | r | 200 |
| ש | shin | sh | 300 |
| ת | thao | th | 400 |

Hébreu

वर्ष ९ अंक ३ २१ फेब्रुवारी १९५८

# संजीवन



**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

---

## प्रार्थना आणि ध्यान

१२ जुलै १९१८

एकाएकी तुझ्यासमोर माझा अभिमान गळून पडला. तुझ्या सान्निध्यांत असतांना, स्वतःच्या अतीत जाण्याची इच्छा करणें हें कसें व्यर्थ आहे हें मला समजलें....आणि मी रडलें; मनसोक्त अश्रू मी ढाळले. माझ्या जीवनांतील ते मधुरतम अश्रू! न लाजतां, मोकळेपणानें तुझ्यासमोर ओघळलेले ते अश्रू! .....खरेंच, किती मधुर होते ते. त्यांनीं मला किती शांत आणि विश्रांत वाटलें. पित्याच्या बाहुमध्यें असलेल्या बालकाप्रमाणें माझें तें रडणें होतें कां? पण तो दिव्य पिता तरी किती थोर. किती उदात्त, भव्य आणि अगाध त्याचें ज्ञान! आणि सांत्वन करण्याचें सामर्थ्य तरी केवढें महान्, अपरंपार! खरेंच, ते अश्रू पावन दंवबिंदुप्रमाणें होते. माझ्या स्वतःच्या दुःखविमोचनाकरतां मी ते ढाळले नव्हते म्हणून कां ते इतके विशुद्ध होते? खरोखरीच, ते किती मधुर आणि हितकर होते. त्यांच्यामुळेंच मी माझें सारें हृदय तुझ्यापुढें मोकळेपणानें उघडें केलें आणि काय चमत्कार, मला तुझ्यापासून दूर ठेवणारीं राहिलेलीं सारीं विघ्नें क्षणार्धांत पार वितळून गेलीं!

कांहीं दिवसांपूर्वीं मला कळलें होतें, मी अशी वाणी ऐकली होती: "मनमोकळेपणानें आणि निःसंकोचपणें जर तूं माझ्या म्हणण्याला प्रतिसाद देशील तर अनेक गोष्टी बदलून जातील, एक महान् विजय प्राप्त होईल." आणि म्हणूनच जेव्हां माझ्या हृदयामधून माझ्या

नेत्रांपर्यंत अश्रू आले तेव्हां मी तुझ्यासमोर येऊन बसले व भक्तिभावानें नैवेद्य म्हणून ते तुला अर्पण केले. खरेंच, हें अर्पण किती मधुर आणि संतोषदायी होतें.

आणि आज, आतां जरी मीं अश्रू ढाळत नसले तरी तुझें सान्निध्य मला इतकें निकट-पणें अनुभवाला येत आहे कीं त्यामुळें माझें सारें अस्तित्वच हर्षानें थरारत आहे.

भक्तियुक्त वंदन करून माझा अडखळणारा भीरू भाव मला व्यक्त करूं दे.....

हर्षभरित बालकाप्रमाणें मी तुला हांक मारून म्हटलें :—

"हे सर्वोत्तम एकमेव जिवलगा, आम्ही तुला काय प्रार्थना करणार आहोंत हें तुला आधींच कळतें कारण तूंच तर त्याचें उगमस्थान असतोस !

"हे सर्वोत्तमा, माझ्या एकमेव सुहृदा, आम्ही कसेंहि असलों तरी तसा तूं आमचा स्वीकार करतोस, आमच्यावर प्रेम करतोस, आमचें अंतरंग ओळखतोस; कारण तूंच तर आम्हांला तसें बनविलेलें असतेस !

"हे सर्वोत्तम एकमेव पथप्रदर्शका, आमची जी उच्चतम इच्छा असेल ती तूं कधींच अमान्य करीत नाहींस, कारण तूं स्वतःच आमच्याद्वारां ती इच्छा करीत असतोस. आमची याचना ऐकण्याकरितां, आम्हांला जाणून घेण्याकरतां, आमच्यावर प्रेम करण्याकरतां किंवा मार्गदर्शन करण्याकरतां आम्ही तुझ्याखेरीज अन्य कोणाकडे धांव घेणें हें चुकीचें ठरेल; कारण तूं नेह-मींच हें करीत असतोस, तूं आम्हांला कधींहि अंतर देत नाहींस.

तुझ्यावर संपूर्ण भरंवसा टाकून, पूर्ण निश्चिंत राहिलें असतां आणि सहजभावानें व मन-मोकळेपणानें तुला समग्र, निःशेष आणि निर्दोष असें समर्पण केलें असतां प्राप्त होणाऱ्या सर्वो-त्तम, उदात्त आनंदाची तूं मला जाणीव करून दिलीस.

आणि हे प्राणप्रिया, प्रमुदित बालकाप्रमाणें एकाचवेळीं मी तुजसमोर स्मित केलें आणि अश्रूसिंचन केलें !

CWMCE Vol 01 : Page 369

*

२४ सप्टेंबर १९१७

खडतर साधना तूं माझ्याकडून करवून घेतलीस. तुझ्याप्रत नेणाऱ्या सोपानानें मी पायरी पायरीनें चढलें; आणि सर्वांत शेवटच्या पायरीवर तुझ्याशीं तादात्म्य पावण्यांतील संपूर्ण आनं-दाची माधुरी तूं मला चाखावयास दिलीस. नंतर तुझी आज्ञा शिरसावंद्य करूनच पायरी-पायरीनें मी बहिर्मुख व्यवहारांत व जाणीवेच्या बाह्यवर्ति पातळीपर्यंत उतरलें. तुझा शोध घेण्यासाठीं ज्या जगताचा मी त्याग केला होता त्यामध्यें मी पुनश्च प्रवेश केला, त्याच्याशीं पुनःश्च संबंध जोडला. आतां मी सोपानाच्या सर्वांत खालच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचलें आहे. येथें माझ्या सभोंवतीं आणि आंतहि सर्वच कांहीं इतकें नीरस, सामान्य प्रतीचें आणि उदासीन आहे कीं त्यामुळें माझी मति कुंठित झाली आहे.

कोणत्याहि प्रकारची तपस्या न करतां, सर्वसामान्य बहुजन जी स्थिति प्राप्त करून घेतात तीच स्थिति जर माझ्या वांट्याला यावयाची असेल तर इतक्या मंद, आणि प्रदीर्घ पूर्वतयारी-चा काय उपयोग ? तर मग माझ्याकडून तुझी वास्तविक अपेक्षा तरी काय आहे ?

मी जें जें पाहिलें आहे तें पाहिल्यानंतर, जें जें अनुभवलें आहे तें अनुभवल्यानंतर, तुझ्या ज्ञानमंदिराच्या पवित्र गाभाऱ्यामध्यें तुझ्याशीं एकत्व पावण्याचा अनुभव तूं मला दिल्यानंतरहि

इतक्या सामान्य अवस्थेमध्यें नेऊन तूं मला सर्वतोपरी इतके सामान्य साधन बनविणें हें कसें काय शक्य आहे? खरेंच, हे प्रभो, तुझे मार्ग, तुझे हेतु अगम्य आहेत, माझ्या आकलनशक्तीच्या बाहेरचे आहेत.

तुझ्या संपूर्ण दिव्य परमानंदाचें तेजस्वी रत्न तूं माझ्या अंतःकरणांत ठेवून, त्याच्या पृष्ठभागावर मात्र बाह्य छाया कां प्रतिबिंबित होऊं देतोस? त्यामुळें तूं मला प्रदान केलेल्या शांतीचा, दिव्य संपदेचा मागमूसहि लागत नाहीं; ती जणुं निष्प्रभ ठरते. असें कां? . . . खरोखरीच हें सारें गूढ आहे, माझी मति यानें गुंग होते.

इतकी महान् आंतरिक नीरवता तूं मला दिल्यानंतरहि मी इतका वाचाळपणा कां करावा, इतक्या क्षुल्लक गोष्टींमध्यें विचारमग्न कां रहावें हेंच मला कळत नाहीं . . . . . कां? कां असें? . . . . अनंत काळपर्यंत मी अशी विचारणा करूं शकेन, पण बहुधा ती निष्फळच ठरणार.

तुझी आज्ञा शिरसावंद्य करणें आणि प्राप्त परिस्थितीचा मुकाट्यानें स्वीकार करणें एवढेंच माझें काम.

आतां, अनंत काळपर्यंत आपलीं वेटोळीं उलगडणाऱ्या जगत्‌रूपी विराट् शेषाचें तटस्थपणें निरीक्षण करणारी मी एक केवळ प्रेक्षक आहे.

*

(कांहीं दिवसानंतर––)

प्रभो, तुझ्या आज्ञेसमोर असमर्थ ठरून कितीदां तरी मी तुला काकुळतीनें विनविलें आहे :
—"या पार्थिव चेतनेच्या गर्तेपासून मला दूर ठेव; तुझ्याशीं परम ऐक्य साधून त्यांत मला विलीन होऊन जाऊं दे."

पण मला माहीत आहे, माझी प्रार्थना भिन्नेपणाची असली पाहिजे; आणि म्हणूनच ती फलद्रूप होत नाहीं.

—श्रीमाताजी

# श्रीमाताजी–स्वतःविषयीं

मी कोणत्याहि देशाची नाहीं, कोणत्याहि संस्कृतीची नाहीं, कोणत्याहि समाजाची नाहीं, कोणत्याहि वंशाची नाहीं; केवळ भगवंताची आहे.

मी कोणाहि मालकाची, सत्ताधीशाची, कोणत्याहि कायद्याची अथवा सामाजिक रूढींची आज्ञा मानीत नाहीं, तर केवळ एका भगवंताचीच आज्ञा मानते.

त्यालाच मी माझें सर्वस्व, माझी संकल्पशक्ति, जीवन आणि आत्मा समर्पित केला आहे. त्याची इच्छा असेल तर त्याच्यास्तव मी माझें थेंब न् थेंब, सारें रक्त संपूर्ण आनंदानें देण्यास तयार आहे; त्याच्या सेवेसाठीं केलेल्या कोणत्याच गोष्टीला आहुति म्हणतां येणार नाहीं; कारण त्यामध्यें सर्व कांहीं परिपूर्ण आनंदच आनंद आहे.

फेब्रुवारी १९२० 

* * *

एकादी व्यक्ति 'अमुक एक' आहे आणि ती 'अमुक एक गोष्ट करते', ती 'आंतून अमुक आहे' व बाहेरून पाहतां 'अमुक तऱ्हेनें वागतें' या दोन गोष्टी खरोखरीच अगदीं भिन्न आहेत. त्यांच्यांत सरमिसळ करून समजुतीचा घोटाळा करून घेतां कामा नये. मी 'कोण आहे' हें मला माहीत आहे. दुसऱ्यांना कांहीं वाटलें, दुसरे कांहीं म्हणाले, किंवा जगतांत कांहीं घटना घडल्या तरी सत्य जें आहे, मी जी कोण आहे, ती आहेच, ती असणारच. त्या सत्यरूपावर कशाचाहि परिणाम होणार नाहीं; तें बदलणार नाहीं. त्याचें सत्यस्वरूप त्याला स्वतःला सत्यच असणार. जगानें न मानलें तरी त्याचें सत्यत्व कमी होणार नाहीं किंवा मानलें म्हणून वाढणारहि नाहीं. मी जी कोणी आहे, ती असूनहि बाहेर अमुक तऱ्हेनें कां वागते, हा अगदीं वेगळा प्रश्न आहे. वस्तुस्थिति काय आहे, परिस्थिति कशी आहे व काम करतांना कोणामध्यें व कशाच्या द्वारां मला काम करावें लागतें या गोष्टीवर सर्व कांहीं अवलंबून आहे. ज्या सत्यास घेऊन मी आलें आहे तें मला चांगलें माहीत आहे. परंतु या जगांत तें कित-पत व्यक्तदशेस येईल हें सर्व या जगावरच अवलंबून आहे. जें कांहीं जगाला देण्याकरतां मी घेऊन येईन, तें स्वीकारण्यास जग समर्थ असलें पाहिजे व तें स्वीकारण्याची जगाची इच्छा असली पाहिजे. तसें नसेल तर सर्वोच्च व सर्वजयी प्रभावी सत्य त्याच्याकडे आणूनहि ज्याला कसलीच जाणीव नाहीं व तें स्वीकारण्याची पात्रताहि ज्याला नाहीं अशा मनुष्यास तें पूर्णतः असून नसल्यासारखेंच होईल. या सत्यापासून कोणालाहि लाभ होणार नाहीं.

तुम्हीं म्हणाल, येथें आणलेलें सत्य जर सर्वश्रेष्ठ, सर्व-शक्तिमान् आहे तर मग त्याचा स्वीकार करण्यास तें जगास भाग कां पाडीत नाहीं? जगाचा विरोध तें मोडून कां काढत नाहीं? मनुष्य जें सत्य सतत डावलत आहे तें स्वीकारण्याची त्यावर सक्ति करण्यास तें समर्थ नाहीं काय? परंतु जगाची निर्मिति, प्रगति व विकास या अशा सक्तीच्या मार्गानें झालेला नाहीं. 'स्व-तंत्रता' हें तर विश्वनिर्मितीचें मूळ आहे. आद्य चेतनेमध्यें एक स्वयंभू स्वच्छंद उर्मी उठली आणि त्याचें प्रत्यंतर, ती जगद्रूपांत विलसण्यांत दिसून आलें. विश्वाच्या

मूलगत स्वभावाचें मुख्य वैशिष्टय हें 'स्वातंत्र्यच' आहे. सर्वश्रेष्ठ सत्याचा व उच्चतम मांगल्याचा जगानें जरी अव्हेर केला तरी ती गोष्ट त्यानें स्वयंप्रेरणेच्या आनंदानें, स्वेच्छेनें केलेली असेल. त्याचा स्वीकार करावयाचा असेल तर तोहि त्यानें स्वेच्छेनें व आनंदानें केला पाहिजे. चुका करणाऱ्या या जगाला सक्तीनें अथवा हुकुम सोडून सन्मार्गाला वळण्यास फर्मावलें आणि समजा लगेंच आज्ञापालन करून तें योग्य मार्गावर आलें; पाहिजे त्या गोष्टी अशा आकस्मिक रीतीनें अथवा चमत्कार घडवून करून घ्यावयाच्या असतील तर हें जग निर्माण करण्यांत कांहींच मुद्दा नाहीं. निर्मिति म्हणजे वर्धन, विकास-लीला आहे. पायरी पायरीनें, क्रमाक्रमानें चाललेला एक प्रवास, काल आणि देश यांच्यामधील अविरत गतिमानता म्हणजेच ही सृष्टि आहे. असेंच एकसारखें पुढें पुढेंच जात जात मूळ स्रोतापासून दूर दूर जायचें आणि शेवटीं पुनः सावकाश सावकाश मूळ स्रोताकडे, मूळ रूपाकडे परत फिरावयाचें—असें ठरवून, या धोरणानें सृष्टीचा व्यापार चाललेला आहे. या सृष्टींत ज्याचा ज्याचा अंतर्भाव आहे त्याच्या त्याच्या स्वतंत्र अशा नैसर्गिक प्रवृत्ती आहेत, त्यांचा त्याग करून बाहेरून लादलेल्या आज्ञांचें परिपालन त्यांनीं करावें अशी कोणावरहि सक्ती नाहीं. अशी सक्ती केली तर सृष्टिक्रमांतील सर्व तालबद्धता—संगीतच नाहींसें होऊन जाईल.

अर्थात् तरीहि एकप्रकारची अनिवार्य अशी दुसरी कोणती तरी प्रेरणा तेथें असतेच. मूळच्या स्रोताकडे अनिवार्यपणें खेंचणारी, स्वतःच्या स्वभावामध्येंच एक गुप्त शक्ति काम करीत असते. तिचें दडपण एकसारखें मानवास सर्व प्रकारच्या चढउतारामधून पुढें पुढें नेत राहिलेलें असतें. ईशकृपाबळानेंच सर्व कांहीं होतें आणि व्हावें असें आपण जेव्हां बोलतो तेव्हां त्याचा अर्थ दुसरा कोणताच नसतो. मनुष्याला पुनः परत मूळ स्रोताकडेच जलदीनें घेऊन जाण्याचें, त्याला अधिकाधिक गति देण्याचें कार्य या ईशकृपेच्या द्वारें घडतें. आपल्या मूळरूपाची पुनः ओळख पटण्याकरितां त्याचे हे प्रयत्न ईशकृपेनें फळाला येतात. पण दुसऱ्या बाजूनें ज्या आत्म्याचा हा प्रवास चाललेला असतो त्याच्याकडूनहि या प्रक्रियेला प्राथमिक स्वरूपाची संमति व वरचेवर नवीन उत्साहानें या उद्दिष्टास चिकटून राहण्याची प्रवृत्ति अपेक्षित असते. या कार्यास आत्म्याचें जाणीवपूर्वक सहकार्य हवें असतें. आंतरजीवनांत व उच्चतर पातळीवर जी शक्ति आधींपासूनच नेहमीं कार्य करीत असते ती बाहेर काढण्यास किंवा निदान बाह्य जगांत तिची प्रतिष्ठापना करण्यास, तिचें राज्य निर्माण करण्यास हें सहकार्य साह्यभूत होतें. सृष्टिक्रमाच्या खेळाला साह्यभूत असलेल्या गोष्टी या आहेत. या खेळाची ही अशी व्यवस्था गृहीत आहे. स्वखुषीनें व मनापासून सहकार्य देणाऱ्या देहांत कृपा काम करते. अशा व्यक्तींद्वारांच ती मूर्तरूप धारण करते. या व्यक्ती विश्वांत कार्य करणाऱ्या शक्तीचे अंगभूत भाग होऊन जातात.

पृथ्वीच्या व जगताच्या नियतीनेंच ही गोष्ट ठरविली असल्यानें, मीं ज्या सत्यास येथें आणलें आहे तें मूर्तदशेस येऊन प्रकट रूप धारण करणार हें निश्चित. किती काळ लागणार हा येथें प्रश्न नाहीं. ज्या सत्याचें पृथ्वीवर प्रकटीकरण होणार आहे असें मी म्हणतें, तें एका दृष्टीनें पाहतां, या आधींच मूर्त झालें आहे. त्याची अनुभूति आधींच आली असून, तें सुप्रतिष्ठित केव्हांच होऊन गेलें आहे. चेतनेमध्यें कालातीत अवस्थेंतून कालमर्यादेंत उतरण्याची एक विशिष्ट प्रक्रिया आहे, एक अवतरण-क्रीडा पद्धति आहे. त्या प्रक्रियेस किती कमी अथवा

अधिक वेळ लागणार हें, जे कोणी त्याचें मापन करणार त्यांच्या चेतनेच्या पातळीवर अवलंबून राहील. हें कालमापन केव्हांहि सापेक्षच असतें. परंतु आपल्या समोरील प्रश्नांतील हा कालाविषयींचा विचार प्रधान नाहीं. महत्त्वाची गोष्ट इतकीच कीं, सत्य विद्यमान् आहे, पूर्ण क्रियाशील आहे; प्रकटीकरणाच्या वाटेवर आहे. फक्त तें पाहणारे डोळे हवे आहेत आणि त्याचें स्वागत करणारें उत्सुक आत्मे हवे आहेत.

* * *

# श्रीमाताजींची घोषणा

## (१५ ऑगस्ट १९५४)

दीर्घकाळ हृदयाशीं बाळगलेला एक मनोरथ––मी एक भारतीय नागरिक व्हावें––हा मनोरथ प्रकट करून हा दिवस साजरा करावा असें मला वाटतें. १९१४ सालीं मी ज्या वेळीं भारतांत प्रथम आलें तेव्हांपासूनच माझी ही भावना झालेली आहे कीं, भारत हीच माझी खरी मातृभूमि आहे; माझी आत्मभूमि आहे, कर्मभूमि आहे. भारत स्वतंत्र होतांच या मनोरथास मूर्त रूप देण्याचा माझा मानस होता. पण येथें, पाँडीचेरींतील आश्रमाच्या माझ्या जबाबदारीमुळें मला आणखी कांहीं काळ वाट पहावी लागली. आतां मी ती घोषणा करूं शकेन अशी सुवेळा प्राप्त झाली आहे.

परंतु श्रीअरविंदांच्या आदर्शानुरूप, सत्य हें विभजनापेक्षां ऐक्यांतच अधिक असतें हें दाखवून देणें हा माझा यामध्यें हेतु आहे. एका नागरिकतेचा त्याग करून दुसरीचा स्वीकार करणें ही समस्येची समर्पक सोडवणूक नव्हे. म्हणून फ्रेंच राहूनहि मला भारतीय नागरिकत्व दिलें जावें, दुहेरी राष्ट्रीयत्व स्वीकारण्याची मला परवानगी मिळावी अशी मी इच्छा करते.

जन्मानें नि प्रारंभींच्या शिक्षणानें मी फ्रेंच आहे, तर स्वखुशीनें आणि पूर्व प्रवृत्तीनुसार मी भारतीय आहे. माझ्या चित्तांत या दोहोंमध्यें कांहींच विरोध नाहीं, उलटपक्षीं या दोन्हींचा चांगला समन्वय साधून एक दुसरीस पूरक ठरूं शकते. मला हेंहि माहित आहे कीं, मजकडून दोहोंचीहि समसमान सेवा होऊं शकेल. कारण श्रीअरविंदांच्या महान् उपदेशाला मूर्त रूप देणें हेंच माझ्या जीवनाचें एकमेव ध्येय आहे. त्यांच्या शिकवणीनुसार पहातां सर्व राष्ट्रें मूलतः एक असून सुसंघटित व सुसंवादी विविधतेंतून या पृथ्वीवर दैवी ऐक्य प्रकट करणें हेंच त्या सर्वांच्या अस्तित्वाचें एकमेव उद्दिष्ट आहे.

––श्रीमाताजी

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

## नूतन-वर्ष-संदेश

प्रकृतीच्या अपरंपार भांडाराविषयीं मी एका प्रवचनाच्या ओघांत बोललें होतें. ही अक्षय सृजनशील प्रकृति अगणित आकार धारण करते, त्यांना एकमेकांत मिसळते, पुनः ते पृथक् करते, पुनश्च त्यांना आकार देते, सतत नवनवीन निर्मिति करण्याकरतां पहिल्या आकारांचा विध्वंस करते, नाश करते; असें मी सांगितलें होतें. ही एक जणुं मोठी कढई आहे; त्यामध्यें तुम्ही ढवळलेंत कीं त्यांतून कांहींतरी उत्पन्न होतें. ती उत्पन्न केलेली वस्तु चांगली नसेल तर ती पुनः त्यांत तुम्ही फेंकून देतां व दुसरी एकादी वस्तु बाहेर काढतां. एकादा आकार, दोन आकार किंवा शेंकडों आकार धारण केले तरी त्याचें तिला विशेष कांहींच नाहीं. कारण हजारों, अगणित आकार ती धारण करूं शकते आणि कार्य करण्याकरतां शेंकडों, हजारों, लक्षावधि वर्षें लागलीं तरी त्याचेंहि तिला कांहींच नसतें. अनंत काल तिच्यासमोर असतो. अर्थात् ही तिची एक करमणुकच असते. तिला कशाची घाई नसते. एकादें कार्य किंवा कार्यभाग झटकन् पूर्ण करून टाकावा, तडीस न्यावा, असें तुम्ही म्हणूं लागलांत तर तिचें उत्तर ठरलेलें असतें: "पण कां? कशासाठीं? ह्यांत तुम्हांला आनंद नाहीं घेतां येत?"

ज्या दिवशीं संध्याकाळीं मीं तुम्हाला या गोष्टी सांगितल्या त्या दिवशीं मी स्वतः संपूर्णतया सर्वांगानें प्रकृतीशीं तादात्म्य पावलें, तिच्या लीलेमध्यें मीं प्रवेश केला. या तादात्म्य पावण्याच्या क्रियेस, एक प्रतिसादरूप प्रतिक्रिया निर्माण झाली. प्रकृति आणि मी यांच्यामध्यें एक नवीन प्रकारच्या जिव्हाळा निर्माण झाला. आम्ही अधिकाधिक जवळ जवळ येत यत शेवटीं त्या क्रियेचें पर्यवसान ८ नोव्हेंबरच्या अनुभूतीमध्यें झालें.

एकाएकीं, तत्क्षणीं प्रकृतीनें जाणलें. तिनें असें जाणलें कीं, ज्या एका नव-चेतनेचा जन्म झाला आहे तिला, प्रकृतीचा निषेध किंवा तिच्याशीं प्रतिरोध करावयाचा नसून प्रकृतीचा सर्वांगीण स्वीकार करण्याचा तिचा हेतु आहे; प्रकृतीला सर्वांगांनीं आलिंगन देण्याची तिची इच्छा आहे. प्रकृतीच्या हें लक्षांत आलें कीं, ही नवीन आध्यात्मिकता जीवनपराङमुख नाहीं; ती जीवनाला टाळणारी नाहीं. तिच्या हालचालींच्या घडामोडींच्या विराट् वैपुल्यासमोर भिऊन माघार घेणारी नाहीं; तर उलट तिच्या सर्वांगांचा समन्वय साधण्यास ती उत्सुक आहे. येथें अवतरलेली अतिमानस-चेतना आपणांस संक्षेप देणार नसून आपणास पूर्णता प्राप्त करून देणार आहे, हें प्रकृतीला समजलें.

त्यानंतर परम सत्तेंतून अशी आज्ञा झाली: "जागृत हो; हे प्रकृति, सहकार्यांतील आनंद जाणून घे." आणि तत्काळ, "होय, मला मान्य आहे. मी सहकार्य देईन," असें म्हणत अखिल प्रकृतीनें प्रचंड आनंदोर्मींत, आनंदाच्या उत्साहांत स्वतःस सर्वस्वीं देऊन टाकलें; आणि जणुं कृतज्ञतेच्या भावनेनें समर्पित झालेल्या प्रकृतीच्या या आनंदाच्या प्रचंड पुराचा, या देहाला-

आधाराला-जशाचा तसा, कांहींहि कमी होऊ न देतां, स्वीकार करतां यावा, तो आनंद धारण करतां यावा, म्हणून त्याचवेळीं तेथें एक अचंचल निश्चलता, परम निश्चलता निर्माण झाली. प्रकृतीनें ती आज्ञा शिरसावंद्य केली. तिच्यासमोर असलेल्या अनंत कालावधीमध्यें, ही अतिमानसचेतना तिच्या कार्याला महान् शक्ति, महान् प्रेरणा देणार आहे; अधिक चांगल्या रीतीनें तिचें कार्य पूर्णत्वास नेणार आहे, तिच्या लीलेस अधिक विराट् रूप देऊन अधिक उच्चतर नाना संभाव्यता ती निर्माण करणार आहे, असें तिनें पाहिलें.

सूक्ष्म भौतिक जगतामध्यें कांहीं वेळां महान् प्रगतीच्या समयीं ऐकू येणारे बीथोवनच्या (Beethoven) 'रे' नांवाच्या संगीतरचनेंतील स्वरांशीं साम्य असलेले, कांहीं महान् स्वर जणुं पृथ्वीच्या सार्‍या कोनाकोंपर्‍यांतून घुमत असलेले मला ऐकू आलें. प्रकृति आणि चैतन्य या फार जुन्या स्नेह्यांच्या दीर्घकालच्या वियोगानंतर झालेल्या तादात्म्याच्या-भेटीच्या-आनंदाची घोषणा करण्याकरितां जणुं एकाच वेळीं शेंकडो वृंदवादनें, एकही स्वर बेसूर न होतां, एकदम वाजूं लागलेलीं मी ऐकलीं. नंतर हे शब्द स्फुरले—"हे प्रकृति, हे पृथ्वी[1] माते, तूं म्हटलें आहेस कीं तूं सहकार्य देशील; आणि ह्या सहकार्याच्या समृद्धीला सीमा नाहीं."

आणि संपूर्ण शांतीमध्यें या समृद्धीचा परमानंद प्रसृत होत असल्याचा मला अनुभव आला अशा रीतीनें या नूतन वर्षाच्या संदेशाचा उद्‌भव झाला.

तरीपण या अनुभवाच्या अर्थाविषयीं चुकीची समजूत करून घेऊन तुम्ही अशी कल्पना करतां कामां नये कीं, आतां यापुढें सर्व कांहीं विनायासें आणि आपल्या स्वतःच्या इच्छेस अनुकूल असेंच नेहमीं घडेल. या पातळीवर तसें असणार नाहीं. जेव्हां आपणांस पाऊस नको असेल तेव्हां तो पडणार नाहीं; एकादी गोष्ट जगांत घडावी असें आपल्याला वाटलें कीं ताबडतोब ती घडून येईल किंवा सर्व अडचणी नाहींशा होतील व पर्‍यांच्या गोष्टींतल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडतील असा याचा अर्थ नव्हे. याहून अधिक गूढ अर्थ त्याला आहे. तो म्हणजे प्रकृतीच्या नानाविध शक्तींच्या लीलेमध्यें तिनें, ही नवीनच आविर्भूत झालेली शक्ति समाविष्ट करून घेतलेली आहे; तिच्या घडामोडींमध्यें तिनें या नवीन शक्तीचा अंतर्भाव करून घेतलेला आहे. अर्थातच प्रकृतीच्या घडामोडी, प्रकृतीच्या राज्यांतील गोष्टी, या मानवाच्या पातळीहून अनंतपटीनें श्रेष्ठ पातळीवर व मोठ्या प्रमाणावर नेहमीं चाललेल्या असतात; मानवाच्या सामान्य जाणीवेच्या दृष्टिपथांत त्या येऊं शकत नाहींत. अशाच रीतीनें सूक्ष्म जगतांत, आंतरिक मनोमय जगतांत ही संभाव्यता निर्माण झालेली आहे, पृथ्वीवरील घटनांमध्यें स्पष्ट दिसून येणार्‍या बाह्य बदलाचें स्वरूप अजून तिला प्राप्त झालेलें नाहीं.

आतां पर्‍यांच्या गोष्टी पृथ्वीवर प्रत्यक्षांत येण्याची वेळ आली आहे, अशी भोळी समजूत तुम्ही करून घेण्याचा संभव आहे म्हणून हें मी तुम्हांस सांगत आहे. तो क्षण अजून इतक्यांत आलेला नाहीं.

आपल्याठिकाणीं अत्यंत धीर पाहिजे व घटना कशा घडत असतात हें जाणण्यासाठीं अति व्यापक आणि समृद्ध अशी दिव्य दृष्टि पाहिजे. ज्याला आपण चमत्कार म्हणतो ते शाब्दिक, म्हणजेच केवळ गोष्टींत सांगण्यापुरतेंच फक्त नसतात. अत्यंत प्रगल्भ, गहन दिव्यदृष्टीला हे

---

[1]अखिल जडतत्त्व या अर्थानें.

चमत्कार प्रतीतहि होऊं शकतात; पण ही दृष्टि खरोखरीच अत्यंत विशाल आणि सर्वग्राही अशी असली पाहिजे.

परमेश्वराच्या कृपाकार्याचा बोध करून घेण्यापूर्वीच आपल्याला तिच्या कार्यपद्धती व प्रक्रिया अनुसरण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. बाह्य रूप-आकार यायोगें अंध न होण्याची शक्ति प्रथम आपल्याजवळ असली पाहिजे म्हणजे मगच वस्तुजाताच्या अंतरंगींचें गभीर सत्यरूप आपण पाहूं शकूं.

पण निदान, या वर्षांत वेळ व्यर्थ जाऊं नये यासाठीं अटोकाट प्रयत्न करण्याचा उपयुक्त संकल्प तरी आजच्या या सायंकाळीं आपण निश्चित करूं शकूं.

CWMCE Vol 09 : Page 247

★

# २

## एक साहस

साहसप्रिय असे कांहीं लोक असतात. त्यांना मी आवाहन करीत आहे. मी त्यांना सांगत आहे—

"महान् साहसपूर्ण अशा कार्याकरितां मी तुम्हांस निमंत्रण करीत आहे. पूर्वीं होऊन गेलेल्यांनीं जें आध्यात्मिक कार्य केलें आहे, त्याचीच पुनरावृत्ति आपणांस करावयाची नाहीं. उलट त्यानंतरच पुढें आपल्या साहसकर्मास प्रारंभ व्हावयाचा आहे. आपणांस नूतननिर्मिति, सर्वस्वी नवीन निर्मिति करावयाची आहे. अननुभूत, अपरिचित अशा कितीतरी गोष्टी, अनेक धोके आणि संकटें त्यांत असतील. हें खरेंच मोठें साहस आपणांस करावयाचें आहे. अर्थात् शेवटीं विजय निश्चित आहे. तरीपण त्याचा मार्ग मात्र आपणांस अज्ञात आहे. कोणींहि न तुडविलेल्या अशा मार्गानें एक एक पाऊल टाकत टाकत मार्ग शोधून काढावयाचा आहे. आजपर्यंत या विश्वांत कधींहि अस्तित्वांत नसलेली व पुनः याच तऱ्हेनें पुढें ती कधींहि घडणार नाहीं अशी ही घटना आहे. पहा, तुम्हांला त्यांत गोडी वाटत असेल तर टाका पाऊल पुढें. उद्यां काय होईल हें मी सांगूं शकत नाहीं.

आजपर्यंत जें जें पाहिलेलें आहे; जें जें मनांत रचलें आहे, ज्याचा ज्याचा विचार केला आहे, तें तें सर्व मागें टाकून चला, अज्ञात अशा मार्गावर पुढें चला. भविष्यकालाचा विचार करीत बसूं नका!

जें काय व्हायचें असेल तें होवो! चला."

CWMCE Vol 09 : Page 151

★

# ३

## विचार—एक निर्माणकारी शक्ति

मनुष्याचे विचार मनोमय जगतामध्यें कांहीं आकार निर्माण करतात. विचार ही एक निर्माणकारी शक्ति आहे. तुम्ही तर अशाप्रकारें विचार-रूपें एकसारखीं निर्माण करून कडेच्या वातावरणामध्यें फेंकत असतां. तीं विचार-रूपें आपलें कार्य करण्यासाठीं दूरवर योग्य-ठिकाणीं निघून जातात. तुमच्या भोंवतीं अशीं कितीतरी विचार-रूपें सतत वावरत असतात. हें खरें आहे कीं, कांहीं माणसांना सुस्पष्टपणें विचारच करतां येत नाहीं. त्यांच्या विचाराला कांहीं आकारच येऊं शकत नाहीं. त्यांच्याभोंवतीं कसलेतरी नुसते तरंग जणुं जमा होत राहतात. पण जे सुस्पष्टपणें व तीव्रतेनें विचार करूं शकतात त्यांच्या विचारसामर्थ्यानें आकार निर्मिले जाऊन ते सूचित कल्पना अभिव्यक्त करण्याच्या उद्योगार्थ वातावरणांत निघून जातात व पुनः त्यांचा विचार करतांच ते तुमच्याकडे परतहि येतात. अशीं आपणच निर्माण केलेलीं विचार-रूपें आपणाकडे वेगानें परत येतात, आदळतात; कांहीं आपल्या चेतनेंत जणुं घुसूं पाहतात. त्यावेळीं स्वतःचा त्यांच्यापासून बचाव करणें फार कठीण होऊन बसतें. बलवान् विचाराचे योगानें ज्या विचाररूपास तुम्ही निर्मितां तें रूप नेहमींच तुमच्याजवळ राहतें, दूर लोटलें तरी पुनः पुनः तुम्हांला येऊन तें चिकटत असतें. दरवेळीं अधिक जोरानें तुमच्या मेंदूवर येऊन आदळत असतें. पुढें असें होऊन जातें कीं तें विचाररूप म्हणजे तुमची एक आवश्यक गरजच बनून राहते. या बाबतींत अभ्यास करायचा म्हटलें तर एक गूढ जगतच तुमच्यासमोर उभें राहील, असा हा विषय आहे. माणसास मुळींच ज्ञान नसतें. स्वतःला अजिबात जाणीव नाहीं अशा कित्येक शक्ती त्यांच्याठिकाणीं वसत असतात. समजा, जाणीव असली तरी ती अत्यल्प असते.

पुराणपरंपरेस अधिक चिकटून राहणारे सनातनी बौद्ध लोक परमेश्वर किंवा कांहीं एक शाश्वत सत्य म्हणून अस्तित्वांत असावें, असें मानीत नाहींत. दिव्य, शक्तिमान् कांहीं देव-देवतांचें अस्तित्वहि त्यांना मान्य नसतें. अर्थात् मन व मनःशक्ति यांचा उपयोग कसा करावयाचा, याविषयींचें कांहीं लोकांना असलेलें ज्ञान मात्र कौतुकास्पद असतें. बौद्धपद्धतीनें अभ्यास करून तुम्ही मनाचे स्वामी बनून, त्याचा एक प्रभावी साधन म्हणून उपयोग करूं शकतां. बौद्ध पद्धतीनें अभ्यास केलेला एकजण एकदां मजकडे आला आणि म्हणाला, मी एक प्रयोग केला आहे. त्यानें काय केलें होतें? स्वतःच्या विचारसामर्थ्यानें त्यानें एक विचार-रूप, कोणी महात्मा निर्माण केला होता. अशारीतीनें निर्माण केलेला जीव नंतर स्वतंत्रपणें, निर्मात्याच्या स्वामित्वाखेरीजहि जीवनक्रम सुरूं करूं शकतो; निर्मात्याशीं थोडासा संबंध कधींकधीं राहतोहि; तरीपण त्याचें अस्तित्व स्वतंत्र असतें; इच्छाहि स्वतंत्र असतें. हे सर्व त्याला माहीत होतें. तरीहि स्वनिर्मित, स्वतंत्र इच्छावान् अशा या महात्म्यामुळेंच त्याला मोठी अडचण उत्पन्न होऊन बसली होती. तो मला म्हणाला, "तुम्हाला माहीत आहे कां? माझा 'महात्मा' मी इतक्या निर्दोषतेनें निर्माण केला आहे कीं त्याला आतां स्वतंत्र

व्यक्तिमत्व प्राप्त झालें असून, आतां तो मला वरचेवर येऊन त्रास देऊं लागला आहे. हा महात्मा माझ्याकडे येतो आणि या ना त्या कसल्यातरी गोष्टीबद्दल माझी निंदा करतो, मला दोष देतो. अमुक कर, तमुक करूं नको, असा उपदेश करूं लागतो. एकंदरीत माझ्या संपूर्ण जीवनाचाच तो ताबा घेऊं पहात आहे. त्याच्यापासून कसें सुटावें हेंच मला समजेनासें झालें आहे. कांहीं उपाय सुचत नाहीं. काय करावें तें कळत नाहीं. हा 'महात्मा' मला त्रासदायक झाला आहे. मला कसली ती विश्रांतीहि तो घेऊं देत नाहीं. माझ्या प्रत्येक हालचालींत, वागणुकींत तो हात घालूं पाहतो. माझ्या कामांत अडथळा आणतो. इतकें असूनहि मला माहीत आहे कीं, हा 'महात्मा' म्हणजे दुसरीतिसरी कोणी व्यक्ति नसून मींच ती निर्माण केली आहे आणि तिला आतां मी टाळूंहि शकत नाहीं." या महात्म्याच्या तावडींतून सुटण्याचा कसाकसा यत्न त्यानें केला, तें सर्व त्यानें, त्यानंतर मला सांगितलें; त्याला केवळ या बाबतींतली जी एक साधी युक्ति माहीत नव्हती ती मीं त्याला सांगितली. त्यानें तिचा उपयोग करतांच त्या महात्म्यापासून त्याची सुटका झाली. दुसऱ्या दिवशींच सकाळीं तो आनंदानें सांगत आला, "माझा महात्मा माझा पिच्छा सोडून गेला." संबंध कसा तोडायचा हें त्याला माहीत नव्हतें. अर्थात् नुसता संबंधाचा धागा तोडून भागत नाहीं; कारण असे निर्माण झालेले जीव संबंधाखेरीज, स्वतंत्रपणें, अलग असें अस्तित्व टिकवूं शकतात. आपण जें निर्माण केलें तें पुनः स्वतःमध्यें जिरविण्याचें, जणु गिळंकृत करण्याचें कौशल्य अशा माणसास हवें असतें, दुसरें कांहीं नाहीं.

CWMCE Vol 06 : Page 277

*

## ४

## वैराग्य

शरशय्येवर पडून राहिलेले बैरागी तुम्हीं पाहिले आहेत ना? कां बरें तसें ते पडून रहातात? कदाचित् त्यांना आपलें साधुत्व सिद्ध करावयाचें असेल! पण ही गोष्ट जेव्हां ते सार्वजनिक रीत्या करूं लागतात त्यावेळीं मात्र त्यांच्या वर्तनाबद्दल किंतु वाटूं लागतो. वाटतें, हें त्यांचें एक वैराग्याचें सोंग आहे. त्यांच्यापैकीं कांहींच्या बाबतींत प्रामाणिकपणा आणि गांभीर्य दिसून येतें; केवळ देखावा करण्याचा त्यांचा उद्देश नसतो. अशांच्या बाबतींत, ते असें कां करत असावेत असा प्रश्न उभा रहातो. यावर त्यांचें असें म्हणणें असतें कीं, देहापासून आम्ही अनासक्त आहों कां नाहीं हें पहाण्यासाठीं आम्ही असें करतो. कांहीं तर याहि पुढें जाऊन असें प्रतिपादन करतात कीं, आत्म्यास देहापासून मुक्त करावयाचें असेल तर देहास दुःख भोगावयास लावलेंच पाहिजे. तथापि माझें असें मत आहे कीं, मानवाच्या ठिकाणच्या प्राणतत्वास दुःखभोगांची एक प्रकारची आवड असते आणि या अशा विकृत

आवडीसाठींच त्याच्याकडून देहावर दुःखभोगांचा दंड लादला जातो. कांहीं मुलें जखम झाल्यावर, अधिक दुःख व्हावें म्हणून तो भाग मुद्दाम दाबतात आणि असें करण्यांत त्यांना आनंद वाटतो. वयस्कर माणसेंहि अशीं वागतांना मीं पाहिलीं आहेत——मात्र नैतिक क्षेत्रांत अशीं उदाहरणें सर्वांनाच परिचित आहेत. मी नेहमीं लोकांना म्हणतें——"तुम्हीं दुःखी आहांत, कारण तुम्हांला दुःख हवें असतें; तुम्ही भोग भोगतां, कारण तुम्हांला ते प्रिय वाटतात; अन्यथा तुमच्या वांटयास ते कधींच आले नसते." ही एक रोगट अवस्था आहे असें मी म्हणते; कारण सुसंवाद नि सुंदरता यांच्या ती विरुद्ध आहे. तीव्र संवेदनांची मनुष्यास गरज असते असें मानण्याची ती एक खोड असते. तुम्हांला माहीत आहे, कल्पनाहि करतां येणार नाहीं अशा, देहास पीडा देण्याच्या अमानुष प्रखरतम पद्धती, चिनी लोकांनीं शोधून काढल्या आहेत? जपानमध्यें असतांना, चीनबद्दल गाढ प्रेम असलेला एक जपानी मला भेटला. त्याला चीनमधील या प्रकाराबद्दल विचारल्यावर तो म्हणाला, "पूर्वेकडील लोकांची (जपानी लोक कांहीं याला अपवाद नाहींत) संवेदनक्षमता अति मंद आहे. त्यांना भावनांची बाजू जवळ जवळ नाहींच. कष्टभोग अत्यंत तीव्र असल्याखेरीज त्यांना ते दुःखकष्ट वाटतच नाहींत." यामुळेंच शरीरपीडनाच्या अत्यधिक तापदायक साधनांच्या शोधार्थ आपली बुद्धि खर्चणें त्यांना भाग पडलें, असो.

साऱ्या जडप्रवृत्तीच्या किंवा तमोगुणी प्रकृतीच्या लोकांनीं आपली संवेदनक्षमता मंदावून घेतलेली असते——जेवढी जडता अधिक, तितका तमोगुण अधिक. अशा लोकांच्या बाबतींत संवेदनांची अनुभूति संवेदनांच्या उग्रतेवर व तीव्रतेवर अवलंबून असते. या कारणास्तव अशा स्वभावाचीं माणसें सामान्यतः कठोर असतात; कारण कठोरतेतून अति तीव्र संवेदनांची निष्पत्ति होत असते. तुम्ही ज्यावेळीं एकाद्याला मुद्दाम त्रास देतां त्यावेळीं तुमच्या मज्जातंतूवर ताण पडतो; आणि मज्जातंतूंवर ताण म्हणजेच एक प्रकारची तीव्र संवेदना. कठोर माणसांच्या भावना हलवावयाला अशा संवेनांची गरज असते. नाहींतर, त्यांच्या भावनाच मुळीं जाग्या होत नाहींत. याच कारणास्तव कित्येक वंशच्या वंश विशेष कठोर असलेले आढळून येतात. भावनांच्या दृष्टीनें ते अत्यंत मंद, जड असतात. मानसिक किंवा इतर दृष्टींनीं त्यांच्या ठिकाणीं जाणीवेचा अभाव नसेलहि. मात्र त्यांच्या भावनात्मक आणि शारीरिक भागांत, त्यांतल्या त्यांत शारीरिक भागांत जाणीवेचा अभाव विशेष आढळून येतो.



★

**प्रश्न :——सौंदर्यदृष्टि असणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणीं कठोरता असते काय?**

ही मनोवैज्ञानिक समस्या आहे. कोणत्या क्षेत्रांतील सौंदर्यदृष्टि आहे यावर तें अवलंबून आहे. ही सौंदर्यदृष्टि भौतिक असूं शकेल, भावनात्मक असूं शकेल किंवा मानसिकहि. तुमच्याठिकाणीं नैतिक सौंदर्यदृष्टि असेल, म्हणजेच सभ्यता नि उदात्तता असेल, तर तुम्ही कठोर होणें कधींच शक्य नाहीं. उलट तुम्ही नेहमींच उदारता दाखवाल; तुमच्या हावभावांतून मार्दव प्रतिबिंबित होईल. पण मी वारंवार म्हटल्याप्रमाणें मानवी स्वभाव हा जणुं अनेक भिन्नभिन्न तुकडे एकत्र करून बनलेला असतो. उदाहरणार्थ पहा. पूर्वीं मी कलावंतांच्या

सहवासांत बराच काळ घालवी. गेल्या शतकाच्या अखेरच्या आणि चालू शतकाच्या सुरुवातीच्या साऱ्या मोठमोठया कलावंतांशीं माझा परिचय होता. त्यांच्या संगतींत माझा कांहीं काळहि गेलेला आहे. त्यांची सौंदर्यदृष्टि खरोखरी विशाल. पण नैतिक दृष्टिकोनांतून पाहिलें तर त्यांच्यापैकीं कांहीं स्वभावानें अत्यंत निष्ठुर. आपल्या कलामंदिरांत कार्यरत असलेला कलावंत हा कलेच्या वातावरणांत रहात असतो; पण तुम्ही त्याला घरीं 'गृहस्थ' म्हणून पहातां त्यावेळीं ती एक वेगळीच व्यक्ति असते--'कलावंताचा' व 'गृहस्थाचा' संबंध जवळ जवळ तुटलेलाच असतो. घरांतील त्याच्या जीवनावर असभ्यता आणि नाविन्यशून्यता यांची छाया पडते. अनेक कलावंतांचें जीवन खरोखरीच अशा प्रकारचें असतें. तथापि प्रत्येक गोष्टीस अपवाद असतातच. कांहीं कलावंतांच्या जीवनांत मात्र एकरूपता दृढावलेली असते; त्यांचें जीवन कलामय असतें; तें उदारता आणि सुरेखता यांनीं विनटलेलें असतें.

CWMCE Vol 06 : Page 71

*

# ५

## झाडांवरील भुतें

**तुम्ही आम्हांला त्या दिवशीं सांगितलेंत कीं कांहीं भुतें झाडावरच जखडून टाकलेलीं असतात. तर मग तीं मुक्त कशी होतात ?**

कशासाठीं त्यांनीं मुक्त व्हावें ?

**तुम्ही आम्हांला सांगितलेंत कीं, एका मनुष्याला त्यांच्याबद्दल फार दया आली म्हणून त्यानें त्यांच्यासाठीं प्रार्थना केली व त्यामुळें तीं झाडावरचीं भुतें मुक्त झालीं.**

होय, पण तें सर्व गोष्टीमध्यें होतें. ती एक ख्रिश्चन दंतकथा होती आणि त्यांतलें तत्त्व मनावर बिंबविण्यासाठीं त्यांत असें उदाहरण दिलें होतें. तुम्ही जर दुष्ट असाल तर मृत्यूनंतरहि तुम्हांला कष्ट भोगावे लागतात; म्हणून तुम्ही सदाचरणानें रहावें म्हणजे तुम्हांला दुःख भोगावें लागणार नाहीं, असा धडा त्यांतून शिकावावयाचा होता. वास्तविक या बाबतींत पापपुण्य अथवा प्रायश्चित यांचा कांहीं संबंध नाहीं; केलेल्या कृत्यांबद्दल प्रायश्चित म्हणून भुतांना झाडांना जखडून टाकलेलें नसतें. जेव्हां एकादा मनुष्य मरतो, तेव्हां त्याच्यांतील वासनामय सूक्ष्मदेह शरीराच्या बाहेर जातो. मात्र, त्याला सद्गति मिळावी म्हणून प्रार्थना करावयाला किंवा त्यांतून योग्य मार्गदर्शन करावयाला जर त्या मनुष्याचे, या पृथ्वीवर कोणी मित्र अथवा नातलग नसतील, तर त्याला हा देह सोडून दिल्यानंतर नवीन परिस्थितीमध्यें फारच अपरिचित वाटतें; त्याचें कोणीच आगतस्वागत करीत नाहीं. अशावेळीं एकाद्या झाडावर सहजच त्याला आसरा मिळतो. विशेषत: ज्या झाडाच्या फांद्या मित्राप्रमाणें जणुं

स्वागत करण्यास उत्सुक असतात आणि ज्यामध्यें भरपूर जीवनसत्त्व असतें अशा भल्यामोठ्या जुन्यापुराण्या झाडावर ते आसरा घेतात. झाडाच्या खोडामधून वहाणारा जो रस असतो, झाडाचें जें जीवनसत्त्व असतें, त्याकडे मृत मनुष्याचा वासनात्मक देह आकर्षिला जातो व साहजिकच तो त्याचा आधार घेतो. त्याला कोणी सक्तीनें झाडाला बांधून टाकलेलें आहे व म्हणून त्याला त्यांतून सुटण्याची इच्छा आहे असा तेथें कांहीं प्रश्नच नसतो.

**हीं भुतें त्रासदायक नसतात कां ?**

कोणत्या दृष्टीनें ? साधारणतः तीं तशीं त्रासदायक दिसत नाहींत.

**पण, भुतें लोकांना पछाडतात, त्रास देतात, त्यांचा छळ करतात; अशा कितीतरी गोष्टी आम्ही ऐकतो.**

नाहीं, तीं भुतें वेगळ्या प्रकारचीं. प्राणमय वासनामय जगतांतील ते जीव असतात; त्या आसुरी शक्ती असतात. मृत मनुष्याच्या प्राणमय अस्तित्वांतील जे कांहीं अवशेष राहिलेले असतात, त्याविषयीं आपण आतां बोलत आहोंत. परंतु जेव्हां एकाद्याला भुतांनीं अथवा पिशाच्यांनीं पछाडलें आहे असें आपण म्हणतो त्यावेळीं सुद्धां, वस्तुस्थिति पुष्कळदां अगदीं भिन्न असते. पुष्कळ वेळां हीं भुतें अथवा पिशाच्चें हीं माणसांनींच निर्माण केलेलीं असतात. म्हणजेच, तीं निर्माण व्हायला भीति ही कारण असते. मनानें कल्पिलेल्या एकाद्या रचनेलाच खरी वस्तु समजलेलें असतें. भीति जितकी अधिक असेल तितकी मानस-रचना अधिक प्रत्यक्ष, मूर्त आणि प्रभावी ठरते. अशा तऱ्हेच्या पछाडलेल्या शेंकडों लोकांना मला उपाय करावा लागलेला आहे. बहुतेक वेळां तीं काल्पनिकच असल्याचें मला आढळून आलें आहे. येथून जवळच असलेलें एक झाड भुतांनीं पछाडलें आहे असें मला कोणीं सांगितलें. आपल्या गवळ्यांना त्याची फार भीति वाटे. कित्येकांनीं तर म्हणे, तें पाहिलेंहि होतें ! "तेथें जाऊन थोडा धूप, कापूर जाळ, त्या झाडाला कांहीं प्रदक्षिणा घाल आणि लोकांना सांग, कीं भूत गेलें."—असें मी 'अमृता'ला सांगितलें; आणि खरेंच तें नाहींसें झालेंहि. कारण मुळांत तें इतकें प्रत्यक्ष मूर्त स्वरूप धारण केलेलें भूत नव्हतेंच. अशाच तऱ्हेनें पुष्कळशीं भुतें हीं आपल्याच भीतीमुळें निर्माण झालेलीं असतात.

★

**मेलेलीं माणसें अवशिष्ट भूत या स्वरूपांत अशारीतीनें झाडावर किती काळ रहातात ?**

तें त्या त्या माणसावर अवलंबून आहे. कांहीं अत्यंत अल्प काळ रहाणारे असतात. दुसरीं कांहीं भुतें त्याहून अधिक प्रत्यक्ष रूप घेतलेलीं असतात. ज्या झाडांवर त्यांनीं आसरा घेतलेला असतो तीं झाडें जितकीं जगतील तितकीं वर्षे, हजार वर्षेंसुद्धां, हीं भुतें तेथें राहूं शकतात.

★

**पशू मेल्यानंतराहि त्यांचीं अशीं भुतें निर्माण होतात काय ? तीं भुतें पण झाडें पछाडतात काय ?**

नाहीं. पशूंचीं अशीं भुतें होणें शक्य नसतें. कारण, मृत्यूनंतरहि अस्तित्व कायम टिकण्यासाठीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्राणतत्त्वाची वाढ आणि सुरचना होणें आवश्यक असतें. पशूंमधील प्राणतत्त्व हें तितकेसें आकाराला आलेलें नसतें. तें विरळ, विस्कळित असतें. तें शरीराशीं अत्यंत संलग्न असल्यानें शरीर गेल्यानंतर त्याचें स्वतंत्र असें अस्तित्व टिकूं शकत नाहीं.

जेव्हां एकादा पशू मरतो, तेव्हां त्याच्यांतील प्राणमय सूक्ष्म देह हा ताबडतोब विघटित होऊन पंचमहाभूतांत विलीन होऊन जातो. प्राणतत्त्वाला एकादें विशिष्ट सुसंघटित रूप देण्याचें काम केवळ मनोमय अस्तित्वच करूं शकतें. असें मन केवळ मनुष्यामध्येंच निर्माण झालेलें असल्यानें, त्यानें देह सोडल्यानंतर त्याच्या प्राणमय सूक्ष्म देहाचें स्वतंत्र अस्तित्व कायम राहूं शकतें, दुसरें कोणाचें नाहीं.

*

## ६

## वनस्पतींमधील आकांक्षा

प्रकाश मिळविण्यासाठीं एकसारख्या धडपडणाऱ्या असंख्य वनस्पतींनीं युक्त असें अरण्य व शक्य असलेल्या शेंकडों प्रकारांनीं वळून वळून सूर्यप्रकाशांत येण्याचा प्रयत्न करणारे वृक्ष तुम्ही कधीं पाहिले नाहींत काय ? भौतिक पातळीवरील आकांक्षेचा अनुभव अगदीं असाच असतो—प्रकाश प्राप्तीसाठीं निकड, त्यासाठीं धडपड, प्रेरणा, मनुष्यापेक्षां वनस्पतींच्या भौतिक जीवनामध्यें ही आकांक्षा अधिक प्रमाणांत दिसते. त्यांचें संपूर्ण जीवन प्रकाशाचें पूजन असतें. अर्थात् प्रकाश हें भगवंताचें प्रतीक असून सूर्य हा भौतिक जीवनामधील परम चेतनेचा प्रतिनिधि आहे. वनस्पतींनीं त्यांच्या साध्या, सरळ पण अजाण मार्गानें अगदीं स्पष्टपणें याचा अनुभव घेतलेला असतो त्यांच्या आकांक्षेची जाणीव कशी करून घ्यावयाची हें जर तुम्हांला कळलें तर तिची उत्कटता तुमच्या ध्यानांत येईल. जड प्रकृतीच्या पातळीवर वनस्पति ह्या माझ्या प्रभावाला सर्वांत अधिक उन्मुख असतात—जाणीवेची एकादी अवस्था माणसापेक्षां एकाद्या फुलामध्यें मी अधिक सुगमतेनें संचरित करूं शकते. तें अत्यंत ग्रहणशील असतें. त्याला मन नसल्यामुळें आपला अनुभव सूत्रबद्ध करून स्वतः साठींच संग्रहीत कसा करावा हें त्यास माहीत नसतें. परंतु शुद्ध आंतरात्मिक चेतना प्राप्त करणें त्यास अगदीं सहज, स्वाभाविक असतें. म्हणूनच जेव्हां तुम्ही मला फुलें देतां तेव्हां त्यांची अवस्था साधारणतः नहमीं तुमच्या अवस्थेची द्योतक असते. असें काही लोक असतात, जे माझ्यापर्यंत ताजें फूल

आणण्यांत कधींच यशस्वी होत नाहींत. फूल ताजें असलें तरी त्यांच्या हातांत तें मलूल होतें. उलट दुसरे लोक नेहमीं ताजीं फुलें आणतात आणि मान टाकलेल्या फुलांनाहि नव-जीवन देऊं शकतात. तुमची अभीप्सा तीव्र असेल तर तुम्ही द्याल तीं फुलें नेहमीं प्रफुल्लित, टवटवीत रहातील आणि तुम्ही ग्रहणशील असाल तर जीं फुलें मी तुम्हांला देते त्यांमध्यें घात-लेला संदेश आत्मसात् करण्यासहि तुम्ही अगदीं सहज समर्थ व्हाल. मी जेव्हां तुम्हांला फुलें देते, तेव्हां जाणीवेच्या अवस्था मी तुम्हांस देते; फुलें हीं जणुं मध्यस्थ असतात आणि प्रसाद-पुष्पें प्रभावी होणें न होणें हें सर्वस्वीं तुमच्या ग्रहणशीलतेवर अवलंबून असतें

—श्रीमाताजी

CWMCE Vol 06 : Page 132

---

# श्रीमातेचें साह्य

### विजयाचें आश्वासन

तुम्हांला या मार्गावरून घेऊन जाण्यासाठीं श्रीमाता नेहमीं तुमच्या सन्निध राहील याविषयीं खात्री बाळगा. अडचणी येतील आणि जातील पण ती तुमच्याजवळ असल्यानें विजय निश्चित आहे.

Sri Aurobindo on The Mother Page 325 १८-७-३६

*

### मातेच्या कार्यंवर श्रद्धा

सर्व दृष्यरूपांच्या मागें चाललेल्या मातृशक्तीच्या कार्यांवर दृढ श्रद्धा ठेवून चिकटून राहिलें पाहिजे; त्या श्रद्धेमुळेंच तुम्ही तडीस गेल्याचें तुम्हांस दिसून येईल.

३१-८-३५

*

कोणीहि मनुष्य केवळ आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें अथवा सद्‌गुणांच्या द्वारें दिव्य रूपां-तर प्राप्त करून घेऊं शकत नाहीं. केवळ दोन गोष्टीच महत्वाच्या आहेत; मातेची कार्यं-कारी शक्ति आणि तिच्याप्रत खुलें रहाण्याचा साधकाचा संकल्प व तिच्या कार्यांवर विश्वास. तुमचा संकल्प आणि विश्वास दृढ राखा, बाकी कशाचीहि काळजी करूं नका—साधनेमध्यें सर्वांनाच येणाऱ्या त्या अडचणी आहेत.

Sri Aurobindo on The Mother Page 326 १३-५-३६

*

भावी अडचणी, अधःपतन किंवा आपत्ती यांविषयीं माताजी कधींच विचार करीत नाहींत. प्रेम आणि प्रकाश यांवरच सर्वदा त्यांचें लक्ष केंद्रित झालेलें असतें, अडचणी आणि अधःपात यांवर नाहीं.

Sri Aurobindo on The Mother Page 327 १-८-१९३४

★

## नेहमींच आचरणीय गोष्ट

एकदां एकाद्यानें योगमार्गांत प्रवेश केला म्हणजे त्यानें केवळ एकच एक गोष्ट केली पाहिजे––कांहींहि घडलें आणि कोणत्याहि अडचणी आल्या तरी 'मी शेवटपर्यंत जाणारच' असा दृढनिश्चय राखावयाचा. खरें पाहिलें तर, स्वतःच्या सामर्थ्यानें योगमार्गामध्यें कोणालाच सिद्धि मिळत नाहीं––ऊर्ध्वस्थित महत्तर शक्तीद्वारांच ती प्राप्त होत असते, कोणत्याहि बऱ्यावाईट परिस्थितीमधून जात असतांहि सातत्यानें त्या शक्तीला आवाहन केल्यानें सिद्धि प्राप्त होत असते. ज्यावेळीं प्रत्यक्ष सक्रिय अशी अभीप्सा तुमच्या ठायीं नसेल, त्यावेळींहि, मदत मिळावी म्हणून मातेकडे अभिमुख होऊन रहा––नेहमीं आचरणीय अशी हीच एक गोष्ट आहे.

Sri Aurobindo on The Mother Page 327 ३-१-१९३४

★

## अडचणीमध्येंहि श्रीमातेच्या शक्तीवर विश्वास

आवश्यकता आहे चिकाटीची; निरुत्साही न होतां सतत पुढें जाण्याची. प्रकृतीचें कार्य व मातेच्या शक्तीचें कार्य, अडचणीमधूनहि चालू आहे आणि मातेच्या शक्तीमुळें आवश्यक तें सर्व कांहीं केलें जाईल हें ओळखण्याची जरूरी आहे. आपल्या अपात्रतेमुळें तसें कांहीं बिघडत नाहीं––एकहि मनुष्य असा नाहीं, ज्याच्या स्वभावामध्यें कांहीं अक्षमता नाहीं––पण भगवती शक्तीहि विद्यमान् आहेच. तिच्यावर आपण विश्वास ठेवला म्हणजे अक्षमतेचें क्षमतेमध्यें रूपांतर होऊन जाईल. त्यावेळीं प्रत्यक्ष अडचणी आणि संघर्ष हीं सुद्धां सिद्धि प्राप्त करण्याची साधनें होऊन जातील. २७-५-३७

Sri Aurobindo on The Mother Page 328

★

"मी असमर्थ आहे", "मी पुरेसें प्रयत्नच करीत नाहीं आहे", ही कल्पना कधींहि तुमच्या मनामध्यें येऊं देऊं नका; किंवा तिच्यामुळें त्रस्त होऊं नका. ही तामसिक सूचना आहे. त्यामुळें निराशा येते आणि अयोग्य शक्तींचें आक्रमण होण्यास ही निराशा मार्ग मोकळा करून देते. तुमची वृत्ति अशी पाहिजे कीं, "मला जें शक्य आहे तें मला करूं दे. योग्य वेळीं सर्व कांहीं केलें जावें हें पहाण्यास मातेची शक्ति आहेच; प्रत्यक्ष भगवंत आहेच."

Sri Aurobindo on The Mother Page 328 ४-११-३५

★

## अडचणींत असतांना मातेस आवाहन

तुम्ही आपली इच्छाशक्ति लावूं शकत नसलांत तर त्यावेळीं केवळ एकच मार्ग आहे—शक्तीला आवाहन करावयाचें; कमालीचें निष्क्रिय राहून आघाताला शरण जाण्यापेक्षां केवळ मनानें किंवा मनांतल्या मनांत शब्दानें आवाहन केलें तर तें सुद्धां अधिक चांगलें. त्यामुळें कदाचित् तत्काळ यश न आलें तरी सुद्धां शेवटीं केव्हां तरी शक्ति मदतीला येतेच आणि जाणीव पुनः ग्रहणक्षम होते. कारण या ग्रहणक्षमतेवरच तर सर्व कांहीं अवलंबून आहे. बाह्यवर्ती जाणीवेमध्यें नेहमींच संदिग्धता, अस्पष्टता आणि दुःखक्लेश असतात. परंतु अंतर्मुख वृत्तीचें वर्चस्व जसजसें वाढत जाईल तसतसें, ह्या गोष्टी पाठीमागें अथवा बाहेर दूर ढकलून दिल्या जातात; आणि जाणीव संपूर्णतः अंतर्मुख झाल्यावर तर ह्या गोष्टी राहूंच शकत नाहींत. ह्या गोष्टी कधीं आंत शिरल्याच तर निरुपद्रवी बाह्य संपर्काप्रमाणें त्यांचें अस्तित्व असतें. Sri Aurobindo on The Mother Page 336 २१-८-३३

★

## मातेकडून सत्त्वपरीक्षा

देवाकडून परीक्षा घेतली जाते ही कल्पनाहि तितकीशी सबळ नसून तिच्यावर फारसा जोर देतां कामां नये. भगवंत परीक्षा घेत नाहीं, सत्व पहात नाहीं, तर मानसिक, प्राणिक आणि शारीरिक ह्या खालच्या पातळींवरील शक्ती परीक्षा पहात असतात; आणि भगवंत हें चालू देतो, कारण आंतरात्म्याला जें शिक्षण मिळावयाचें असतें त्यांतीलच तो एक भाग असतो व स्वतःस जाणून घेण्यास, स्वतःच्या शक्ती जाणून घेण्यास किंवा कोणत्या संकुचित मर्यादा आपणांस ओलांडावयाच्या आहेत हें कळण्यास त्याला त्यांचें साह्य होतें. प्रत्येक क्षणीं माताजी तुमची परीक्षा घेत नसून उलट निकृष्ट प्रतीच्या जाणीवेशीं संबंधित असलेल्या अडचणी आणि परीक्षा यांच्या अतीत व वर जाण्यासाठीं त्या प्रत्येक क्षणीं तुम्हांला मदत करीत असतात. विरोधी शक्तींकडून येणाऱ्या हल्ल्यांपासून किंवा तुमच्या स्वतःच्याच हीन प्रकृतीमधून येणाऱ्या आक्रमणापासून सुरक्षित रहाण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्या मातृसाहाय्याची नेहमीं आठवण ठेवावयाची. Sri Aurobindo on The Mother Page 344

★

ज्यावेळीं साधनेमध्यें शरीराकडून फार जोराचा आणि एकसारखा विरोध होत असेल त्यावेळीं, शरीरामध्यें दिव्यशक्तीचें कार्य अधिक प्रभावीरीतीनें व्हावें म्हणून कांहीं भौतिक उपायांचा साधन म्हणून उपयोग करणें लाभदायक होतें, हा माझा स्वतःचा अनुभव आहे. कारण त्यामुळें प्रतिकार करण्यास शरीराला दोन्हीं बाजूंनीं मदत मिळते. भौतिक साधनांच्या द्वारां, औषधांच्या द्वारां आणि अतिभौतिक शक्तीद्वारां; या दोन्हींमधून मातेची शक्ति कार्य करूं शकते. १-९-३६

Sri Aurobindo on The Mother Page 353 —श्रीअरविंद

(Sri Aurobindo on Himself and the Mother मधून.)

# दूरदर्शीपणा

(विद्यार्थ्यांसाठीं)

"किती अचूक नेम !" एका तरुणानें आपल्या लक्ष्यावर नेमका बाण मारला तेव्हां एक प्रेक्षक ओरडला, "किती अचूक नेम !"

"हो ! पण आतां भर दुपारच्या लख्ख प्रकाशांत आपलें लक्ष्य त्याला स्पष्ट दिसत आहे आणि म्हणून त्याचा बाण अचूक लागला. पण दशरथाच्या तोडीचा हा निशाणबाज खास नाहीं."

"दशरथाला काय करतां येत असे ?"

"तो शब्दवेध करीत असे ?"

"शब्दवेध म्हणजे काय ?"

"नुसत्या आवाजाच्या अनुरोधानें अंधारांतहि तो अचूक नेम मारत असे."

रात्रीं अरण्यांत गेला म्हणजे केवळ आवाज ऐकून, पावलांच्या चाहुलीवरून किंवा पंखांच्या नुसत्या फडफडण्यावरून तो कोणता प्राणी वा पक्षी मारावयाचा आहे हें ओळखत असे आणि बाण सोडीत असे. दिवसाउजेडीं बाण मारावा तसा तो अचूक लागत असे.

अयोध्येच्या राजपुत्राची-दशरथाची कीर्ति अशारीतीनें सर्वत्र पसरली होती.

आपल्या 'शब्दवेध-कौशल्याबद्दल' त्याला मोठा अभिमान वाटे. त्याबद्दल त्याची कोणीं स्तुति केली तर ती ऐकून त्याला आनंद होई. दररोज संध्याकाळच्या वेळीं एकटाच रथांत बसून शिकारीच्या शोधार्थ तो घनदाट अरण्यांत जाई. त्यावेळीं पाणी पिण्यासाठीं नदीवर आलेल्या रानम्हशींच्या किंवा हत्तींच्या पायांची चाहूल त्याला लागे, तर कधींकधीं वाघाच्या जपून दबकत टाकलेल्या पावलांचा किंवा हरिणाच्या हलकेंच टाकलेल्या पावलांचा अस्पष्ट आवाज त्याच्या कानीं येई.

एके दिवशीं रात्रीं तो झुडपांच्या जाळींत लपून, पानांची सळसळ किंवा पाण्याचा बुडबुड असा आवाज येतो कां, म्हणून वाट पहात बसला होता. तेव्हां कोणीतरी सरोवराकडे जात असल्याची चाहूल त्याला लागली. दाट अंधार असल्यामुळें त्याला कांहींच दिसत नव्हतें. पण म्हणन काय ? हा तर निष्णात शब्दवेधी होता; सावज ओळखायला केवळ आवाज पुरेसा होता त्याला." "हा नक्की हत्तीच असला पाहिजे !" असें मनाशीं ठरवून त्यानें बाण सोडला, तोंच "वांचवा हो, वांचवा मला कोणी ! मेलो ! मेलो !" अशी किंकाळी त्याला ऐकूं आली. दशरथ चमकलाच. एकदम त्याचें धनुष्य त्याच्या हातांतून गळून पडलें. भीतीनें त्याचें अंतःकरण हादरलेंच ! "काय केलें मीं हें ! रानटी पशूची हत्या करण्याऐवजीं मनुष्याचा मीं घात केला !" धांवतच तो सरोवरापाशीं आला. रक्ताच्या थारोळ्यांत एक तरुण निपचित पडलेला तेथें त्याला दिसला. त्याचे केंस अस्ताव्यस्त झालेले होते. पाणी भरून नेण्यासाठीं आणलेला लोटा त्याच्या हातांत तसाच होता. "महाराज ! आपणच कां

प्राणघातक बाण सोडलांत ? तुमचा कोणता अपराध मीं केला होता म्हणून आपण माझ्याविषयीं असें कठोर मन केलेंत ? मी एक मुनिकुमार आहे. माझें नांव श्रावण. माझे आई-वडील म्हातारे आणि आंधळे आहेत. मीच त्यांची सेवा करतो. जेवण-खाण, कपडेलत्ते मीच सर्वकांहीं त्यांचें पाहतो. त्यांच्यासाठींच पाणी आणण्याकरितां आतां येथें आलों होतो. आतां—यापुढें मी त्यांच्या सेवेला अंतरणार ! या इकडच्या रस्त्यानें आपण जा आणि त्यांच्या झोपडींत जाऊन त्यांना सर्वकांहीं सांगा. पण जाण्यापूर्वीं माझ्या छातींतून हा बाण तेवढा काढा ! किती सलतो आहे हा !"

दशरथानें त्याच्या छातींतून बाण ओढून काढला. श्रावणानें शेवटचा निःश्वास सोडला.

त्या तरुणानें मरतां मरतां दाखविलेल्या रस्त्यानें दशरथ पाण्याचा लोटा घेऊन निघाला. झोपडीजवळ पोंहचतांच श्रावणाचे वडील म्हणाले, "बाळ, आज इतका उशीर कां रे लागला ? आंघोळ कां केलीस तळ्यावर ? वाटेंत एकादें संकट तर तुझ्यावर आलें नाहीं ना ? कशी एकसारखी धागधूग वाटत होती जिवाला ! बरें, पण बोलत कां नाहींस तूं आज ?"

दशरथ कांपऱ्या आवाजांत म्हणाला, "मी आपला मुलगा नाहीं. ऋषिवर, मी एक क्षत्रिय आहे. आतांपर्यंत मला स्वतःच्या धनुर्विद्येबद्दल मोठी घमेंड होती. रात्रीं अरण्यांत शिकारीसाठीं आलो होतो, तेव्हां हत्ती पाणी पीत आहे असें वाटून मीं बाण सोडला. पण, —हाय ! आपल्या मुलाच्या छातींत तो घुसला ! केवढें भयंकर पाप घडलें हें ! सांगा, सांगा, कोणतें प्रायश्चित घेऊं मी या पातकाला ?"

तें ऐकून त्या वृद्ध मातापित्यांना फार वाईट वाटलें. आंतडयाला पीळ पडून ते मोठ्यानें आक्रोश करूं लागले. त्यांनीं राजपुत्र दशरथाला म्हटलें, "आमच्या एकुलत्या एक बाळाकडे घेऊन जा आम्हाला—त्या सरोवराकांठीं कुठें तो मरून पडला आहे ?"

तेथें जातांच त्यांना दुःखाचा उमाळा आला. ते म्हणाले,—

"दशरथा, ऐक ! तुझ्यामुळें आंम्हाला आमच्या प्रिय पुत्राचा वियोग घडला आणि त्यासाठीं अश्रु ढाळायची पाळी आली—तसें, तुला सुद्धां तुझ्या प्रिय पुत्रासाठीं असेंच दुःख करावें लागेल ! पुष्कळ वर्षें जातील, पण तुला ही शिक्षा नक्कीच भोगावी लागेल."

नंतर मुलाच्या अन्त्य विधीसाठीं त्यांनीं चिता पेटविली व त्या धडधडत्या चितेंत त्या दोघांनीं उड्या घेतल्या आणि तीं दोघेहि भस्मसात् झालीं.

वर्षांमागून वर्षें लोटलीं. दशरथ अयोध्येचा राजा झाला. त्याचा कौसल्येशीं विवाह झाला आणि त्याला अत्यंत तेजस्वी पुत्र झाला. तोच प्रभु राम.

अयोध्यापति दशरथाची दुसरी राणीं कैकेयी आणि तिची दासी या दोघींखेरीज, अयोध्येंतील सर्वांचा, राम हा लाडका होता. त्या दोघींनीं दुष्टपणानें रामाविरुद्ध कारस्थानें केलीं; रामाला चौदा वर्षें वनवासास जावें लागलें तेंहि त्याच दोघींच्यामुळें !

त्या वृद्ध माता-पित्यांनीं सरोवराचे तीरीं गतप्राण झालेल्या आपल्या अल्पवयी सुकुमार मुलासाठीं जसे अश्रू ढाळले तसे, राम वनवासाला गेल्यावर, मुलाच्या विरहामुळें दशरथालाहि ढाळावे लागलेच.

ह्या दशरथाचेंच पहा ना ! नुसत्या आवाजाच्या रोखानें आपण अचूक सावज टिपतो, या आपल्या शब्दवेधित्वाच्या कौशल्याचा गर्व झाल्यामुळें त्याच्याठिकाणीं दूरदर्शीपणा राहि-

लाच नाहीं. म्हणूनच अंधारांत बाण सोडतांना सुद्धां त्याला कांहींच वाटलें नाहीं. शब्द-वेधित्वाच्या कौशल्यावर आंधळेपणानें विसंबून राहण्यापेक्षां फक्त दिवसाचा प्रकाश असतांच शरसंधान करावयाचें—असें त्यानें ठरविलें असतें तर? किती चांगलें झालें असतें!

अर्थात् तो स्वभावानें दुष्ट नव्हता; पण जरा अदूरदर्शी मात्र होता. जरासा अविचारी ठरला.

★

एकदां काशीच्या एका व्यापाऱ्याला दोन दुःखग्रस्त म्हातारीं गिधाडें दिसलीं. त्यांना पाहून त्याला दया आली आणि त्यांना त्यानें निवाऱ्याच्या जागीं आणलें. त्यानें शेकोटी पेटविली; त्यांना शेकलें व खाटीकखान्यांतून आणलेले मांसाचे तुकडे त्यांना खाऊं घातले.

पावसाळा सुरूं झाला. गिधाडांची प्रकृति उत्तम झाली. तीं आतां एका पर्वतावर उडून गेलीं. पण त्या व्यापाऱ्याच्या उपकाराची फेड करण्यासाठीं ते उतावीळ होते. म्हणून त्यांनीं जीं मिळतील तीं वस्त्रें कोठून तरी आणून आपल्या उपकारी मित्राला भट म्हणून देण्याचें ठरविलें. घराघरांतून, खेड्याखेड्यांतून जाऊन त्यांनीं उन्हांत वाळत घातलेले सर्व कपडे व्यापाऱ्याच्या घरीं आणून टाकले.

व्यापाऱ्याला त्यांच्या कृतज्ञताबुद्धीचें मोठें कौतुक वाटलें. पण तीं चोरून आणलेलीं वस्त्रें त्यानें वापरलीहि नाहींत, वा विकलीहि नाहींत. त्यानें तीं घरीं जपून ठेवलीं.

या अवधींत त्या दोन्हीं गिधाडांना पकडण्यासाठीं ठिकठिकाणीं जाळीं लावण्यांत आलीं. त्यांतलें एक गिधाड एक दिवशीं एका जाळ्यांत सांपडलें. त्याला राजापुढें नेण्यांत आलें. राजानें त्याला विचारलें," तूं माझ्या प्रजेचीं वस्त्रें कां चोरलींस?"

गिधाड म्हणालें, "एका व्यापाऱ्यानें एकदां मला आणि माझ्या भावाला वांचविलें. त्या उपकाराची फेड करण्यासाठीं हीं आम्हीं वस्त्रें जमा करीत होतो."

आतां त्या व्यापाऱ्याला राजापुढें बोलावून आणण्यांत आलें. त्याला विचारलें तेव्हां तो उद्गारला, "महाराज! गिधाडांनीं मला खूप वस्त्रें आणून दिलेलीं आहेत. पण मीं तीं सर्व एकत्र करून ठेवलीं आहेत; आणि तीं ज्याचीं त्याला देण्यास मीं तयार आहे."

तें ऐकून राजानें त्या गिधाडांना क्षमा केली. कारण तीं अविचारानें वागलीं तरी त्यापाठीमागें कृतज्ञतेची भावना होती. व्यापाऱ्यालाहि राजानें सोडून दिलें. कारण, तो फारच दूरदर्शीपणानें वागला होता.

CWMCE Vol 2 : Page 204 —श्रीमाताजी

हे माते, भारत-आत्म-देवते, आम्हांला मार्गदर्शन कर. म्हणजे आम्ही नेहमींच महान् आदर्शाच्या बाजूला राहूं, आणि आध्यात्मिक क्षेत्रांतील नेता व अखिल मानवजातीचा मित्र आणि साहाय्यक तूंच आहेस, ह्या तुझ्या खऱ्या स्वरूपाचें जगाला दर्शन घडवूं.

—श्रीमाताजी

# योग-समन्वय

## प्रस्तावना

## २

## निसर्गाची तीन पावलें

### (पुढें चालू)

सर्व गोष्टींचा विचार करतां आपणांस कदाचित् अशा निर्णयाप्रत यावें लागेल कीं मानसिक जीवन ही, माणसामध्यें प्रकट झालेली प्रकृतीची नवीन करामत नाहीं, तर मानववंशामध्यें विश्वशक्तीनें पूर्वी जी कांहीं विशिष्ट सिद्धि प्राप्त करून घेतली होती व ज्यापासून कांहीं काळ तिला निराशाजनक माघार घ्यावी लागली होती, त्या पूर्वकल्पामधील सिद्धीची, मानसिक जीवन ही एक शीघ्र पुनरावृत्ति आहे. त्यादृष्टीनें पाहतां, रानटी मनुष्य हा सुसंस्कृत माणसाचा पूर्वज म्हणण्यापेक्षां तो पूर्व-सुसंस्कृत माणसाचा अधोगति पावलेला वंशज म्हणणें सयुक्तिक ठरेल. कारण वैचारिक प्रगल्भतेच्या सिद्धीच्या देणगीचें वांटप, जरी विषम प्रमाणांत झालेलें आढळलें, तरी विचार करण्याची पात्रता मात्र सर्वत्र आहेच. मागासलेल्या जमातीमधील व्यक्तींमध्येंहि, मध्य आफ्रिकेच्या रानटी टोळींतून नुकत्याच बाहेर काढलेल्या नीग्रोंत सुद्धां, कोणत्याहि प्रकारचें रक्तसंमिश्रण न करतां, त्याच पिढीमध्यें, बौद्धिक संस्कृतीचा उच्च दर्जाहि उत्पन्न होण्याचें सामर्थ्य आढळतें. फारतर, अत्यंत पुढारलेल्या युरोपियन बुद्धिमत्तेचें पूर्ण सौंदर्य त्यांत एकदम प्रकट होणार नाहीं, एवढेंच. सर्वसामान्य जनतेमध्यें सुद्धां योग्य परिस्थिति उत्पन्न केल्यास, ज्या प्रगतीस वास्तविक लाखो वर्षें लागलीं असतीं ती प्रगति कांहीं थोडया पिढयांत साध्य झाल्याचें आपण पाहतो. ह्याचा अर्थ असा कीं, एकतर माणसाला देण्यांत आलेल्या मनाच्या देणगीमुळें, उत्क्रांतीच्या चेंगट कायद्याच्या भारांतून त्याची मुक्तता झालेली असावी अथवा वैचारिक जीवनासाठीं लागणाऱ्या भौतिक पात्रतेचा तो मानकरी असल्यानें, योग्य परिस्थितींत व प्रेरक वातावरणांत तो बुद्धिमत्तेचा उच्च विलास स्वाभाविक अधिकारांत प्रकट करूं शकत असावा. रानटीपणाची उपपत्ति, मानसिक अपात्रतेमध्यें नसून, योग्य संधि वा जागृति उत्पन्न करणारी प्रेरणा ह्यांच्या अभावांत आहे. वन्यवृत्ति ही ही साखर-झोंपेची गुंगी आहे; सर्वस्वी अज्ञानाचा अंधार नव्हे.

आधुनिक विचार व प्रयत्न ह्यांच्या दिशेचें अवलोकन केलें तरी असेंच स्पष्ट आढळतें कीं, आधुनिक संस्कृतीचे वाढींत मानसिक जीवनार्थ ज्या शक्यता निर्माण झाल्या आहेत, त्यांचा जागतिक प्रमाणावर प्रसार करून, प्रकृति आतां सर्वसाधारण माणसाचीच बौद्धिक उंची, पात्रता व प्रगति घडविण्याच्या प्रयत्नांत गुंतली आहे. त्या प्रवृत्तीचें धुरीणत्व ज्यांच्याकडे आहे त्या युरोपियन बुद्धिमत्तेनें भौतिकता व बाह्य अवडंबर ह्यांचा जो फुलोरा थाटला आहे तोहि त्या

प्रयत्नांतीलच एक आवश्यक भाग आहे. कारण मानवाची पार्थिव संपदा, प्राणशक्ति व आधिभौतिक वातावरण ह्यांचा मानसिक वाढीला आवश्यक एवढा योग्य पाया तयार करण्याचें काम त्यांतून घडत आहे. शिक्षणाची सार्वत्रिकता, मागासलेल्या जमातींची सुधारणा, कनिष्ठ वर्गांचा अभ्युदय, श्रमाची बचत करणाऱ्या यंत्रांची जोरदार वाढ, सामाजिक व आर्थिक आदर्श-स्थिति निर्माण करणाऱ्या योजना, नागरी-जीवन निरोगी, दीर्घायुषी व सुदृढ करण्यासाठीं चाललेली विज्ञानाची अव्याहत धडपड, हा सर्व ओघ, त्या मागील हेतूंची चटकन ओळख करून देतो. त्या प्रयत्नांत योग्य वा सर्वोत्तम साधनांचा वापर नेहमीं करण्यांत येत असेलच असें नाहीं. तरी, आदर्श व्यक्ती व समष्टि-जीवन उत्पन्न करावें, भौतिक मनाच्या प्राथमिक व योग्य आवश्यकता आणि गरजा पुरवाव्या, प्रत्येकाला पुरेसा मोकळेपणा, वेळ व समान संधि पुरवावी व त्यायोगें कांहीं ठराविक जात, वर्ग आणि व्यक्ति त्यांचेंच केवळ हित न साधतां सर्वच्या सर्व मानवजातीस आपल्या भावना व बुद्धि यांचा परिपूर्ण विकास साधण्याची शक्यता बहाल करावी, असें जें ध्येय त्या प्रयत्नांमागें आहे तें मात्र योग्य असें प्राथमिक ध्येय आहे. सध्यांच्या परिस्थितींत भौतिक व आर्थिक हेतूंचें प्राबल्य कदाचित् त्यामध्यें दिसून येत असेल, परंतु त्यामागें उच्च व महान् प्रेरणाशक्ति काम करत असून, त्या आपल्या प्रकटी-करणाच्या वेळेची वाट पहात आहेत.

जेव्हां ह्या प्राथमिक आवश्यकता पूर्ण होतील, हा जगड्व्याळ उपद्व्याप, उत्तम पाया मिळाल्यानें सुस्थिर होईल तेव्हां मग वैचारिक जीवन कोणत्या हेतूनें कार्यांत रममाण होऊं शकेल ? जर खरोखर मन हेंच, प्रकृतीच्या चढाईचें शेवटचें शिखर असेल तर, बुद्धीची तर्क-शक्ति व कल्पनाविलास ह्यांची पूर्ण वाढ आणि भावना व संवेदना ह्यांची सुसंवादयुक्त परि-पूर्ति करणें एवढें पुरेसें आहे. परंतु जर मनुष्य हा केवळ वैचारिक व भावनाशील प्राणी नसून आतांपर्यंत उत्क्रमित झालेल्या तत्त्वांपलीकडेहि त्यामध्यें अजून कांहीं तत्त्वें उत्क्रमित व्हावयाचीं असतील तर मग मानसिक जीवनाची परिपूर्णता, बुद्धीची सूक्ष्मता, सर्वस्पर्शित्व व उदारता, भावना आणि संवेदना ह्यांची हुकमी वैभवसंपदा हीं सर्व त्या उच्च जीवनाकडे जाण्याची मधली पायरी ठरते; व ज्याप्रमाणें मन शरीरामध्यें अवतीर्ण झाल्यावर तें त्याचा उप-योग करूं लागलें व शरीरानेंहि तदनंतर स्वतःच्याच समाधानाकरितां न जगतां त्या वरिष्ठ शक्तीच्या कार्यासाठीं पाया व साधनसामुग्री ह्या दृष्टीनें स्वतःचा उपयोग करूं दिला तद्वतच आज अप्रकट असणाऱ्या त्या महान् प्रेरणांची ही सर्व साधनसामुग्री ठरेल.

मानसिक जीवनाहून उच्च असणाऱ्या जीवनाचें निश्चयात्मक प्रतिपादन, हा तर भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया आहे. त्या जीवनाची प्राप्ति व सुरचना करणें हें विविध योगमार्गांचें सत्य उद्दिष्ट आहे. मन हें उत्क्रांतीचें शिखर वा अखेरचें साध्य नसून शरीराप्रमाणेंच तें एक केवळ साधन आहे. म्हणूनच योगाच्या परिभाषेंत त्यास अंतःकरण, अंतर्गत उपकरण असें अभिधान प्राप्त झालें आहे. भारतीय परंपरेचें असें प्रतिपादन आहे कीं, हें जें तत्त्व अजून प्रकट व्हावयाचें आहे असें म्हटलें जातें तें कांहीं मानवी अनुभवला अनोळखी नाहीं. पूर्वीं त्याची वाढ झालेली होती; एवढेंच नव्हे तर मानवी प्रगतीच्या कांहीं कालखंडांत त्याचें वर्चस्वहि होतें. तें कांहींहि असो, एवढें मात्र निश्चित कीं त्याचें कांहीं ना कांहीं ज्ञान असावयाचें म्हणजे त्याचें कधींतरी अंशतः तरी प्रकटीकरण झालेलें असलें पाहिज. आणि

जर प्रकृति त्या सिद्धीपासून पतित झाली असेल तर तिच्या या भ्रष्टतेचें कारण कुठें तरी मेळ साध्य न होण्यांत, भौतिक व वैचारिक पायाच्या अपरिपक्वतेंत, उच्च तत्त्वांच्या एकांगी वाढीमुळें कनिष्ठ तत्त्वांच्या बाबतींत झालेल्या हलगर्जीपणांत, असलें पाहिजे. ती दुरुस्ती करण्यासाठीं ती माघारी वळली असली पाहिजे.

परंतु ह्या ज्या उच्च वा वरिष्ठ जीवनाकडे आपल्या उत्क्रांतीची वाटचाल चालली आहे त्याचें स्वरूप तरी काय आहे ? ह्या प्रश्नाचें नीट उत्तर द्यावयाचें म्हणजे आपणांस कित्येक उच्च अनुभूतींचा व असाधारण कल्पनांचा परिचय करून घ्यावा लागेल. प्राचीन संस्कृत भाषेशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत त्या स्पष्टपणें मांडणें जवळ जवळ अशक्यच. कारण त्याच भाषेमध्यें फक्त कांहीं मर्यादेपर्यंत त्याची शास्त्रशुद्ध मांडणी झालेली आहे. इंग्रजी भाषेमध्यें त्याच्या जवळपास जे शब्द आढळतात त्यांना निराळा संदर्भ असल्यानें त्यांचा वापर केल्यास कित्येक गंभीर प्रमाद घडण्याची शक्यता आहे. योगाच्या परिभाषेनुसार ज्याला अन्नकोश व प्राणकोश यांनीं तयार केलेलें स्थूल शरीर असें म्हणतात त्या शारीरिक व प्राण-मय अस्तित्वाबरोबरच मनःकोशानें युक्त सूक्ष्म-शरीर व विज्ञान आणि आनंद-कोश यांनीं युक्त असें अतिमानसिक दैवी स्थितींतील कारणशरीर ह्यांनीं आपलें व्यक्तित्व घटित झालेलें आहे. परंतु विज्ञानकोशांतील हें उच्चज्ञान मानसिक प्रश्नोत्तरांतून व अनुमानांतून किंवा अंतिम शक्यतेबाबत संभवणारे निर्णय व मतें ह्यांच्या तात्पुरत्या व्यवस्थेमधून सुघटित झालेलें नसून तें स्वतःच केवलरूप, स्वयंसिद्ध आणि स्वयंप्रकाशी सत्य आहे; आणि आनंदकोशांतील हा आनंद म्हणजे सुद्धां सुखदुःखांच्या अनुभूतींवर आधारलेल्या हृदयाच्या व संवेदनांच्या सौख्याची श्रेष्ठ अवस्था नसून देशकालस्थितिनिरपेक्ष स्वयंभू आनंद आहे. विश्वातीत, श्रेष्ठ व अनंत अस्तित्वाचा तो स्वभावच आहे. तें अस्तित्वच स्वाानंदमय आहे.

ही मनोवैज्ञानिक भाषा खरोखरच कांहीं सत्य वा संभाव्यता दर्शविते काय ? सर्व योग्यांचा अनुभव त्याला 'होय' असेंच उत्तर देतो व त्याची प्राप्ती हेंच योगमार्गाचें अंतिम ध्येय आहे. आपल्या जाणीवेची सर्वोच्च संभाव्य स्थिति व अस्तित्वाची विशालतम संभाव्य परमावस्था ह्यांचें परिचालन करणारीं हींच तत्त्वें आहेत. आमचें असें म्हणणें आहे कीं साक्षात्कार शक्ति (Revelation) अंतःप्रेरणा (Inspiration) ह्या मनोवैज्ञानिक मनोव्यापारांशीं कांहींसें साम्य असणारी अशी, सर्वोच्च ज्ञानशक्तींची एक एकजीव अवस्था, एक सुसंवादयुक्त साम्यावस्था असते. त्या शक्ती, अंतःप्रेरणायुक्त बुद्धि (Intuitive reason) वा दिव्य मन (Divine Mind) ह्यांच्या पलीकडील प्रांतांत वावरतात. अंतिम सत्याचें त्यांना साक्षात् प्रत्यक्ष दर्शन होत असतें किंबहुना वैश्विक व विश्वातीत अशा सर्व वस्तुमात्रामधील सत्यामध्यें त्यांचें वास्तव्य असून या वैश्विक व विश्वातीत तत्त्वांपासूनच त्यांची घटना झालेली असते व त्या तत्त्वाची ज्ञानपूर्ण क्रिया हें त्यांचें स्वरूप असतें. त्या शक्ती म्हणजे अहंकाराच्या पलीकडे असणाऱ्या ज्ञानसत्तेचा प्रकाश असतात. ती ज्ञानसत्ता विश्वव्यापक व विश्वातीत असून, आनंद हाच तिचा स्वभावधर्म आहे. अर्थातच त्या सर्व अवस्था दैवी आहेत व मनुष्याच्या सद्यःस्थितीचा विचार करतां जाणीव व कार्यशक्ती यांच्या त्या अतिमानवी भूमिका आहेत. आत्म्याच्या त्या अत्युच्च अवस्थेचे, अज्ञाताचें ज्ञानदृष्टीला जें दर्शन घडतें त्याचें सच्चिदानंद हेंच खरोखर यथार्थ अंतिम वर्णन आहे. मग त्याचें चित्रण शुद्ध, अव्यक्त,

निराकार, निर्गुण पुरुष अथवा विश्वाची अभिव्यक्ति करणारा विश्वपुरुष असें कसेंहि केलेलें असो. योगामध्यें ह्यांचा मनोवैज्ञानिक दृष्ट्याहि, म्हणजेच आपल्या व्यक्तिगत अस्तित्वाच्या अवस्था ह्या दृष्टीनेंहि हा दैवी शक्तींचा विचार केलेला आहे. ह्या दैवी शक्ती आपल्या जागृत जाणीवेला अजून परक्या, अपरिचित असल्या तरी अतिचेतन अवस्थेमध्यें त्यांचें आपणामध्यें वास्तव्य असून आपण त्यांच्याप्रत पोंहोचूं शकतो.

त्या सर्वोच्च आविष्कारामध्येंच सर्व उत्क्रांतीचा उगम व तिच्या शक्तीचा मूलस्रोत आहे. म्हणूनच त्यास इतरांप्रमाणें करण न म्हणतां कारणशरीर अशी संज्ञा देण्यांत आलेली आहे. आपल्या सर्व मानसिक प्रक्रिया म्हणजे वस्तुतः यांतूनच निघालेल्या शक्ती असतात; कांहीं निवडक शक्ती एवढेंच. जोपर्यंत ह्या मनःशक्तींचा आपल्या मुळाशीं असणाऱ्या सत्याशीं व्यवस्थित संबंध नसतो तोपर्यंत त्या दिव्य ज्ञानाच्या विकृतीशिवाय दुसरें काय प्रकट करणार ? आपल्या संवेदना व भावना ह्यांचा मूळ आनंदाशीं, प्राणशक्ति व तिच्या क्रिया ह्यांचा मूळ आनंदाशीं, प्राणशक्ति व तिच्या क्रिया ह्यांचा दिव्यचेतनेच्या चिच्छक्तीशीं अथवा संकल्पशक्तीशीं व आपल्या शारीर-जीवनाचा ज्ञान व आनंद ह्यांच्या शुद्ध अस्तित्वाशीं अशाच तऱ्हेचा संबंध असतो. ज्या उत्क्रांतीचा कळस म्हणजे मानव आहे असें आपण म्हणतो तिचें स्वरूप ह्या दृष्टीनें अवलोकन करतां 'खालीं शाखा वरी मूळ' असें उलटें दिसतें. मूळभागीं असणाऱ्या ह्या वरिष्ठ शक्ती आपल्या एकत्वानें व विविधतेनें शरीर, प्राण आणि मन ह्या कनिष्ठ वस्तूंचें द्रव्य व कार्य ह्यांचा उपयोग करून त्यांची वाढ व पूर्णत्व साधतात. हेतु हा असतो कीं ज्या सनातन व दिव्य अवस्थांतून त्यांची उत्पत्ति झाली आहे त्यांचा नित्यनतन व बहुरंगी विलास ह्या कनिष्ठ शक्तींनीं करावा. विश्वाचें हेंच जर अखेरचें सत्य असेल तर मग उत्क्रांतीचें ध्येय, हेंच तिचें मूल कारणहि आहे असें म्हणावें लागतें. जें मूळतत्त्व ह्या वस्तुजातामध्यें आधींच प्रविष्ट आहे तेंच त्यांतून विकसित होऊं पहात आहे, मुक्त होऊं पहात आहे असें म्हणतां येतें. मात्र मुक्ती याचा अर्थ, या कनिष्ठ तत्त्वांमधून मुक्तता असा केवळ घेतला तर ती मुक्ति निश्चितच अपूर्ण ठरेल. मूळतत्त्व या कनिष्ठ अवस्थांमधून उन्मुक्त झाल्यानंतर त्यानें पुनः खालीं येऊन या कनिष्ठ तत्त्वांच्या शक्ती व कार्यें उन्नत व परिवर्तित केलीं पाहिजेत. अशातऱ्हेनें कनिष्ठ तत्त्वांचें परिवर्तन जर होणार नसेल तर तें उच्च तत्त्व आधींच सुप्त व सर्वव्यापी आणि प्रभावी आहे असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. पण जर मानवी मन हें दैवी प्रभेच्या वैभवानें प्रकाशूं लागेल, मानवी भावना व संवेदना परमानंदाचें साधन होऊन त्याच्या लीला खेळवूं लागतील, दिव्य आणि निरहंकारी महान् शक्तीचें, मानवी क्रिया, केवळ प्रतिनिधित्व करतील, एवढेंच नव्हे तर स्वतःच त्या शक्तीचें स्फुरण अनुभवतील व मानवी शरीर विशुद्ध, दिव्य पावित्र्याचें भागीदार होऊन, नित्यनूतनता व सतत नमनीयता धारण करून हे उच्च अनुभव व शक्ति यांना चिरकाल वास्तव करण्यास योग्य असें मंगल मंदिर निर्माण करील, तर प्रकृतीचा हा महान् उद्योग सार्थ व यशस्वी होईल व उत्क्रांतीचा महान् अर्थ त्यानें प्रकट होईल.

ह्या श्रेष्ठ अवस्थेचें, सर्वोत्तम अस्तित्वाचें ओझरतें दर्शनहि इतकें देदीप्यमान् आहे व त्याचें आकर्षण इतकें जबरदस्त आहे कीं, त्याचें एकदां दर्शन होतांच त्याच्या प्राप्तीसाठीं इतर सर्व गोष्टींचा त्याग करण्यास आपण लगेच तयार होतो. सर्व गोष्टी मनावरच अवलंबून

आहेत व मानसिक जीवन हेंच एकमेव ध्येय आहे असें नेहमीं वाटत असतें. पण याच्या उलट ह्या अल्प दिव्यानुभूतीनें असें वाटूं लागतें कीं मन ही एक अयोग्य विकृति व जबर अडथळा असून, मिथ्या जग कल्पिण्यास तेंच कारणीभूत आहे, ते स्वतःच असत्य आहे व आपणांस अंतिम मुक्ति साधावयाची असेल तर मनाच्या सर्व क्रियाव अनुमानें ह्यांचा त्याग करून त्यासच नष्ट केलें पाहिजे. परंतु असें वाटणें हेंहि एक अर्ध-सत्य आहे; कारण त्यामध्यें आपण मनाच्या मर्यादा जाणतो, पण त्याच्या ईश्वरी दिव्य कामगिरीकडे दुर्लक्ष करतो. अंतिम ज्ञान तेंच, जें परमेश्वराचें विश्वव्यापक व त्याच बरोबर विश्वातीतहि अस्तित्व पहातें व मान्य करतें आणि पूर्ण योग तोच, ज्यायोगें साधक विश्वातीत तत्त्व आत्मसात् करून विश्वामध्येंहि परत येऊं शकतो व त्याचा अंगीकार करूं शकतो आणि अस्तित्वाच्या या महान् सोपानावर स्वतंत्रपणें चढण्याची व उतरण्याची क्षमता कायम राखूं शकतो. जर अनादि अनंत ईश्वराची दिव्य प्रज्ञा म्हणून कांहीं अस्तित्वांत असेल तर मग मनस्तत्त्वाचीहि कांहीं उच्चतर उपयुक्तता व नियत कार्य असलेंच पाहिजे. अर्थात् विकासक्रमाची चढण व उतरण ह्यामधील कोणत्या अवस्थेमध्यें तें आहे यावर उपयुक्तता अवलंबून राहील. मनस्तत्त्वाची परिपूर्णता व त्याचें संपूर्ण रूप-गुणांतर हीच त्याची नियति असली पाहिजे; त्याचें उच्चाटन किंवा विनाश ही त्याची अंतिम गति निश्चित नाहीं.

अशाप्रकारें प्रकृतीनें टाकलेल्या तीन पावलांचा आपण मागोवा घेतला. ह्या आधिभौतिक जगतांत आपल्या अस्तित्वास पायाभूत असणारें शारीर जीवन, त्यानंतर उत्क्रांत होणारें व शारीर जीवनाचा उच्च उपयोग करून त्यास अधिक पूर्ण व विशाल करणारें मानसिक जीवन व ह्या दोहोंचाहि ध्येयबिंदु असणारें व त्यांना उच्चतम अवस्थेंतील स्वातंत्र्याचा अनुभव देण्यासाठीं स्वतःच त्यांच्या दाराशीं पुनः येणारें दैवी जीवन, ह्यांपैकीं कोणत्याहि अवस्थेस आपल्या शक्यतेपलीकडील न मानतां, व आपल्या मूळ स्वभावाच्या दृष्टीनें अगदींच तुच्छ न समजतां त्यांच्यापैकीं कोणाचाहि नाश करणें हें अंतिम सिद्धीसाठीं आवश्यक आहे असें न मानतां आपण त्यांची मुक्ति व पूर्णता हा आपल्या योगाचा निदान एक भाग व त्याच्या ध्येयाचेंहि एक मोठें व महत्त्वाचें अंग मानून आतां पुढें चलूं या.

—श्रीअरविन्द

स्वतंत्र आणि अखंड असा भारत उदयास येईल आणि भारतमाता आपले पुत्र आपल्या भोंवतीं एकत्र आणून त्यांना एकजीव बनवून त्यांच्यारूपानें महान् आणि अविभक्त अशा जनसमुदायांत एक अविभाज्य, अखंड राष्ट्रशक्ति निर्माण करील.

५ फेब्रुवारी १९४८

—श्रीअरविन्द

# अंतस्थ दिव्य माता

अंतस्थ दिव्यमाता कधींहि सक्ती करीत नाहीं; कसलाहि हक्क सांगत नाहीं कीं भय दाखवीत नाहीं; ती स्वतःचेंच आत्मदान करते, स्वतःला देऊन टाकते, प्राणिमात्र आणि वस्तु-जात यांच्या हृदयगुंफेत लपून रहाते; स्वतःला विसरवून टाकते, स्वतः विरून जाते. कोणाला दोष देत नाहीं, कीं गुणदोषांचें मापन करीत बसत नाहीं. कोणास शाप देत नाहीं, कीं कोणाची निंदा करीत नाहीं. उलट, त्रास वाटून न घेतां पूर्णत्व प्राप्त करून देण्यासाठीं, टाकून न बोलतां सुधारण्यासाठीं, उतावीळपणा न करतां उत्साह देण्यासाठीं; ग्रहणशक्तीनुसार सर्व प्रकारची संपत्ति देऊन प्रत्येक मनुष्यास समृद्ध करण्यासाठीं, ती निरंतर कार्यरत असते. ती माऊली आहे. तिचें प्रेम पोटीं धरतें आणि भरणपोषण करते; सांभाळ करतें व रक्षण करतें; सल्ला देतें व सांत्वन करतें; कारण ती सर्वांस जाणते, सर्वांना आधार देते; चुकां-कडे दुर्लक्ष करते व क्षमा करते; सर्वांविषयीं आशा बाळगते आणि सर्वांना सत्पात्र बनविते, सुसज्ज करते. सर्वांनाच ती स्वतःच्या ठिकाणीं धारण करीत असल्यामुळें तिच्या जवळ जें कांहीं असतें तें सर्वांच्याच मालकीचें असतें. ती सर्वांचें अनुशासन करते; आणि म्हणूनच ती सर्वांचीच सेवकहि असते. याच कारणासाठीं लहान अथवा थोर, जे कोणी लोक तिच्या-बरोबर सत्ताधीश होण्याची किंवा तिच्यामधील देवपद मिळविण्याची इच्छा करतात, ते केवळ जुलमी सत्ताधीश न होतां सर्वसेवक बनून जातात.

—श्रीमाताजी
'परम शोध' मधून

# दुर्गास्तोत्र

माते दुर्गे, सिंहवाहिनी, सर्वशक्तिदायिनी माते, शिवप्रिये तुझ्या शक्तीपासून उत्पन्न झोलेले आम्ही, भारताचे तरुण, तुझ्या मंदिरामध्यें बसून प्रार्थना करीत आहोंत.

माते, ऐक, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतामध्यें आविर्भूत हो.

माते दुर्गे, युगानुयुगें आणि जन्मोजन्मीं मानव-शरीर धारण करून, तुझें कार्य करून आम्ही आनंदधामास परत जातो. आणि यावेळींहि जन्म घेऊन तुझ्याच कार्यासाठीं आम्ही स्वार्पण केलें आहे. माते, ऐक; या भूतलावर आविर्भूत हो, आम्हांला साह्य कर.

माते दुर्गे, सिंहवाहिनी, त्रिशूलधारिणी, वीरशस्त्रधारिणी, सुंदर शरीरधारिणी, जयदात्री माते, तुझी मंगलमय मूर्ति पहाण्यास आम्ही आतुर आहोंत. भारत तुझी मार्गप्रतीक्षा करीत आहे. माते ऐक, पृथ्वीवर अवतीर्ण हो, भारतभूमीमध्यें आविर्भूत हो.

दुर्गे माते, बलदायिनी, प्रेमदायिनी, ज्ञानदायिनी शक्तिस्वरूपिणी, तूं सौंदर्यमूर्तिहि आहेस

आणि रौद्र रूपहि धारण करतेस ! जीवनसंग्रामामध्यें आणि भारतसंग्रामामध्यें आम्हां योद्धयांना तूं प्रेरित केलें आहेस; आमच्या मनाला आणि हृदयाला असुराची दुर्दम्य शक्ति दे, आसुरी बल दे; आमच्या बुद्धीला आणि आत्म्याला देवांचें चारित्र्य आणि ज्ञान दे.

माते दुर्गे, जगांत श्रेष्ठ अशी भारतजाति घोर अंधःकारांत बुडून गेली आहे. माते, तूं पूर्वक्षितिजावर उगवतेस आणि तुझ्या दिव्य शरीराच्या प्रभेबरोबरच उषा येऊन अंधःकाराचा नाश करते. माते, तिमिराचा नाश कर आणि प्रकाशाचा विस्तार कर.

माते दुर्गे, आम्हीं तुझीं मुलें आहोंत, तुझ्या कृपाप्रसादानें, तुझ्या प्रभावानें महान् कार्य आणि महान् ध्येय यांसाठीं आम्हांस योग्य बनव; माते, आमची क्षुद्रता, स्वार्थ आणि भीति लयाला ने.

दुर्गे, नृमुंडमालिनी, दिगंबरी, हातांत तलवार घेऊन आसुरांचा विनाश करणारी तूं काली-माता आहेस.

हे देवी, आमच्या अंतरंगांतील शत्रूंचा तुझ्या क्रूर आरोळीनें निःपात कर; त्यांच्यापैकीं एकहि शत्रूला जिवंत ठेवूं नकोस. आम्ही निर्मळ आणि निष्कलंक व्हावें एवढीच आमची प्रार्थना आहे. हे माते, तूं आपलें रूप प्रकट कर.

माते, दुर्गे, स्वार्थता, भीति आणि क्षुद्रता यामध्यें भारत बुडून गेला आहे. हे माते, आम्हांस महान् बनव, आमचे प्रयत्न महान् कर, आमचें अंतरंग विशाल कर आणि आम्हांस सत्य-संकल्पाशीं एकनिष्ठ रहाण्यास शिकव. क्षुद्रता व शक्तिहीनता यांची आम्ही इच्छा करूं नये, आलस्याच्या आहारीं जाऊं नये आणि भीतीनें ग्रस्त होऊं नये अशी कृपा कर.

माते दुर्गे, अंतस्थ शत्रूंचा संहार कर आणि बाह्य विघ्नांचें निर्मूलन कर. विशालमानस, पराक्रमी आणि बलशाली अशी भारतजाति भारताच्या, पुनीत वनांत, उपीक प्रदेशांत, गगनचुंबी पर्वतांच्या गुहांमध्यें आणि पवित्र-सलिल नद्यांच्या तीरावर, प्रेम आणि ऐक्य, सत्य आणि शक्ति, कला आणि साहित्य, विक्रम आणि ज्ञान यांनीं सतत-युक्त होऊन रहावी हीच मातृचरणीं आमची प्रार्थना आहे. माते, तूं आविर्भूत हो.

माते दुर्गे, तुझ्या योगबलद्वारां आमच्या शरीरांमध्यें प्रवेश कर. आम्ही तुझ्या हातांतील साधन होऊं, अशुभविनाशी तलवार होऊं; अज्ञान-विनाशी प्रदीप होऊं. माते, भारत युव-कांची ही आशा पूर्ण कर. स्वामिनी होऊन हें साधन कार्यकारी कर; अशुभ-विनाशी होऊन तुझी तलवार घुमव; ज्ञानप्रकाश वितरण करण्यासाठीं हा दीप हातीं घे. माते, आविर्भूत हो.

माते दुर्गे, एकदां तूं आम्हांस घेतलेस कीं आम्ही तुझें कधींहि विसर्जन करणार नाहीं; प्रेम आणि भक्ति यांच्या धाग्यांनीं आम्ही तुला आमच्यापाशीं बांधून टाकूं. माते, ये. आम-च्या मनामध्यें, प्राणांमध्यें आणि देहामध्यें तूं प्रकट हो; आविर्भूत हो.

ये, वीरमार्गप्रदर्शिनी, आम्ही तुझें कधींहि विसर्जन करणार नाहीं ! आमचें अखिल जीवन-म्हणजे मातेचें अखंड पूजन व्हावें, आमच्या सर्व कृतींनीं प्रेममय, शक्तिसंपन्न मातेची अविरत सेवा घडावी हीच आमची प्रार्थना आहे. माते, ऐक, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतामध्यें तूं प्रकट हो, आविर्भूत हो.

——श्रीअरविंद

# श्रद्धा आणि शक्ति

मनुष्याची स्वतःवर, स्वतःच्या धारणांवर आणि कार्यशक्तीवर श्रद्धा असते. त्यानें कर्म करावें, निर्मितिकार्य करावें, उच्चतर भूमिका गांठावी व शेवटीं चैतन्याच्या, आत्मदेवतेच्या यज्ञवेदीवर यथासांग आहुति म्हणून आपलें सामर्थ्य अर्पण करावें यासाठीं ही स्वतःवरील श्रद्धा त्यास प्रदान केलेली असते. हा आत्मा बलहीनांना प्राप्त होणार नाहीं असें ऋषिवचन आहे. नायमात्मा बलहीनेन लभ्यः। दुर्बलतेकडे नेणारा स्वतःवरील अविश्वास आणि ध्येयप्राप्ति करून घेण्याचें आपल्या ठिकाणीं जें सामर्थ्य असतें त्याविषयींची साशंकता यांचा त्याग करावयास पाहिजे. कारण शक्तिहीनतेला अयोग्य अशी मान्यता देण्यासारखें तें आहे; दुर्बलतेचा नुसता आभास आहे, आत्म्याचें सर्वशक्तिमत्व नाकारणें आहे. सद्यःस्थितींतील अक्षमतेचें दडपण कितीहि भारी वाटत असलें तरी ती अल्प कालापुरती आलेली अडचण आहे, श्रद्धेची ती कसोटी आहे. पूर्णयोगाच्या साधकाने अज्ञातऱ्हेनें अपात्रतेच्या जाणीवेला बळी पडणें मूर्खपणाचें आहे, कारण आपल्या ठिकाणीं आधींच सुप्त असलेल्या पूर्णत्वाचा विकास करून घेणें हें तर त्याच्या समोरील उद्दिष्ट आहे. प्रत्येक मनुष्याच्या आत्म्याच्या ठिकाणीं दिव्य जीवनाचें जें बीज वसत असतें त्यासाठीं त्यानें केवळ प्रयत्न करावयाचा असतो. त्याच्या प्रयत्नाला यश मिळण्याची शक्यता त्याच्या प्रयत्नांतच सामावलेली असते. शेवटीं विजय हा ठरलेलाच असतो. कारण दिव्य जीवनार्थ चाललेल्या त्याच्या प्रयत्नांमागें सर्वसामर्थ्यवान् शक्तीची प्रेरणा आणि मार्गदर्शन असतें. मात्र स्वतःच्या ठिकाणची ही श्रद्धा विशुद्ध असली पाहिजे. कोणत्याहि प्रकारचा रजोगुणी अहंकार किंवा आध्यात्मिक अभिमान यांचा स्पर्श तिला होतां कामा नये. साधकानें शक्य तितकें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्याची स्वतची शक्ति ही, संकुचित स्वार्थी अर्थानें, त्याची स्वतःची नाहीं तर ती वैश्विक दिव्य शक्तीची आहे; आणि ती स्वार्थी हेतूंसाठीं उपयोगांत आणली तर संकुचितपणास व पर्यायानें अडथळा आणण्यास कारणीभूत ठरेल. आपल्या आकांक्षेच्या पाठीमागें असलेलें दिव्य वैश्विक शक्तीचें सामर्थ्य अमर्याद, असीम आहे. योग्यतऱ्हेनें त्याचा उपयोग केला तर आपणांमध्यें त्या शक्तीचा पुरेपूर संचार होऊन आपल्यामधील सर्व प्रकारची अपात्रता आणि सर्व विघ्नें दूर होतील यांत शंकाच नाहीं. अर्थात् हे अडथळे आणि विघ्नें तत्काळ दूर होतील किंवा कदाचित् त्यास कांहीं अधिक अवधीहि लागेल. कारण त्यांच्याशीं आपण जो झगडा करीत असतो त्यास किती काळ लागावयाचा, त्यांत केव्हां यश यावयाचें हें, साधन या दृष्टीनें अंशतः आपल्या श्रद्धाबळावर व स्वप्रयत्नांवर अवलंबून असलें तरी अंतिमतः सर्वचालक, सर्वज्ञ, योगेश्वराच्या, परमेश्वराच्याच हातीं केवळ त्याचीं सर्व सूत्रें असतात.

आपल्या सामर्थ्याला नेहमीं दिव्य शक्तीवरील श्रद्धेचा आधार असला पाहिजे. आपल्या सामर्थ्यामागें ही श्रद्धा असली पाहिजे; आणि जेव्हां त्या दिव्य शक्तीचा आविष्कार होतो त्यावेळीं ही आपली श्रद्धा सर्वांगीण आणि परिपूर्ण झाली पाहिजे, असली पाहिजे. सनातन काळापासून अखिल-सृष्टि निर्माण करीत आलेल्या आणि आत्म्याच्या सर्वशक्तिमानतेचें, कर्तुं अकर्तुं शक्तीचें पाठबळ असलेल्या विश्वदेवतेला, जागृत चैतन्यमय विश्वशक्तीला अशक्य असें कांहींच नाहीं. अखिल ज्ञानभांडार, सारीं शक्तिसामर्थ्यें, सर्वप्रकारचें यश आणि विजय, सर्व

प्रकारचीं कर्मे आणि कौशल्य तिच्याच हातीं असून विविध प्रकारच्या पूर्णत्वाचें व सिद्धींचें, आत्म्याच्या संपदेचें लेणें त्यांना चढलेलें असतें.

ही विश्वशक्ति, ही मातृशक्ति **माहेश्वरी** आहे, सर्वोच्च ज्ञानदेवता आहे, सर्व प्रकारची सूक्ष्म दिव्य दर्शनशक्ति आणि सत्याची अपार असीमता, आध्यात्मिक संकल्पशक्तीची तिची ऋजुता आणि तिच्या अतिमानसिक विशालतेची स्थिरता व उत्कटता त्याचबरोबर तिच्या प्रबोधन शक्तीचा परमानंद ती आपणांस प्रदान करते.

ती **महाकाली** आहे, सर्वोच्च सामर्थ्यदेवता आहे. सर्व दिव्यबल आणि आध्यात्मिक शक्तिसामर्थ्य तिचेंच आहे. तपःशक्तीची उग्रतम तीव्रता आणि युद्धतत्पर शीघ्र गतिमानता त्याचबरोबर पराजय, मृत्यू आणि अज्ञानशक्ती यांना कःपदार्थ लेखणारें 'अटहास्य' व विजयोन्माद तिच्याजवळ आहे.

ती **महालक्ष्मी** आहे, सर्वोच्च प्रेम आणि दिव्यानंद यांची ती देवता आहे. आत्म्याचा कृपाप्रसाद, दिव्यानंदाची मोहिनी आणि सौंदर्य, त्याचबरोबर संरक्षण आणि सर्व प्रकारचें मानवी व दैवी आशीर्वचन हें तिचें वरदान आहे.

ती **महासरस्वति** आहे, दिव्य रचनाकौशल्य आणि दिव्यकर्म यांची ती देवता आहे. 'योगः कर्मसु कौशलम्' हें तिच्या योगाचें स्वरूप असून दिव्यज्ञानाचें हितकारी प्रयोजन करणें, आत्मचैतन्याचे गुण जीवनामध्यें उतरविणें आणि त्याच्या सुसंवादाचें सौख्य जगाला प्रदान करणें हें तिचें योगक्षेत्र आहे.

या कोणत्याहि शक्तिरूपांत व व्यक्तिरूपांत असतांना सर्वदा, सनातन 'ईश्वरी'च्या प्रभुत्वसंपन्न सर्वोच्च जाणीवेनें ही विश्वशक्ति युक्त असते. साधनभूत व्यक्तीकडून ज्या कोणत्या कार्याची मागणी केली जाईल तें कार्य पार पाडण्यासाठीं लागणारी तत्पर आणि दिव्य क्षमता तिच्या ठिकाणीं असते. प्राणीमात्रांच्या सर्व कार्यकारी शक्तींशीं एकत्व पावण्याची, सहभागी होऊन सहानुभूति देण्याची, लीलेनें संयोग पावण्याची शक्ति तिच्याठायीं असल्यानें विश्वांतील सकल दिव्यसंकल्पाशीं, उत्स्फूर्त आणि फलदायी सुसंवाद ती साधूं शकते. म्हणून, तिच्या सान्निध्याची आणि आपल्यामधील अंतस्थ शक्तींच्या जिवंत जवळकीची जाणीव राखून आपल्या जीवनामध्यें घडणाऱ्या तिच्या सर्व कार्यांना, आपल्या अस्तित्वांतील प्रत्येक भागानें, स्वखुशीनें व संतोषानें मान्यता देणें ही, महाशक्तीवरील श्रद्धा परिपूर्ण झाल्याची शेवटची खूण आहे.

——श्रीअरविंद

(Synthesis of Yoga वरून)

# श्रीमातृशक्ति

माता ही एकच आहे. परंतु आपणासमोर ती भिन्नभिन्न स्वरूपांत व्यक्त होते. तिचीं शक्तीरूपें आणि व्यक्तिरूपें अनेक आहेत, तिच्या अंशविभूति आणि पूणविभूतीहि अनेक आहेत; त्या सर्वच विश्वामध्यें तिचें कार्य करतात. ज्या एकमेवाद्वितीय शक्तीचें माता म्हणून आपण पूजन करतो ती भगवंताची चित्-शक्ति असून अखिल अस्तित्वाची अधिष्ठात्री आहे. ती एकच असली तरी ती इतकी विविधरूपिणी आहे कीं, तिच्या गतींचें आकलन करून घेणें अत्यंत शीघ्रगामी मनाला आणि पूर्ण विनिर्मुक्त व परम व्यापक बुद्धीलाहि अशक्य असते. माता ही परमेश्वणाची चेतना व शक्ति असून तिनें निर्मिलेल्या सृष्टीपासून ती अति-दूर उच्च स्थानीं स्थित आहे. परंतु तिच्या मूर्तरूपांच्या द्वारें तिच्या कार्यपद्धतीचें कांहींसें दर्शन होऊं शकतें, अनुभव येऊं शकतो, आणि ज्या देवतारूपांत आपल्या जीवसृष्टीसमोर प्रगट होण्याचें ती मान्य करते त्या देवतांचा स्वभाव व कार्य ही अधिक निश्चित व मर्यादित असल्यानें तिच्या या कार्यपद्धतीचें आकलन अधिक सुलभ होतें.

आपल्याला व विश्वाला धारण करणाऱ्या चित्-शक्तीशीं जेव्हां तुम्ही एकात्मता अनुभवूं लागतां तेव्हां मातेच्या त्रिविध सत्तेची तुम्हांस जाणीव होऊं शकते. सर्वोच्च आद्य परा-शक्ति ही **विश्वातीत** स्वरूपांत सकल भुवनांच्या वर राहून परमेश्वराच्या नित्य अव्यक्त रहस्याशीं या सृष्टीचा दुवा जोडते. विश्वरूपिणी महाशक्ति **विश्वगत** स्वरूपांत या सर्व प्राणि-मात्रांना उत्पन्न करते, आणि येथील लक्षावधि शक्ती व क्रियाप्रक्रिया धारण करते, त्यांत प्रवेश करते, त्यांना आधार देते आणि त्यांचे परिचालन करतें. तिच्या या बृहत्तर द्विविध सत्तेची शक्ति ती आपल्या **व्यक्तिगत** स्वरूपानें मूर्तिमान् करून त्या सत्तांची आपणांस प्रतीति देते, त्यांना आपल्या संन्निध आणते आणि मानवी व्यक्तित्व व दिव्यप्रकृति यांचा संयोग कर-ण्यासाठीं मध्यस्थाचें कार्य करतें.

अद्वितीया आद्या पराशक्ति, माता सर्व जगतांच्या वर राहून तिच्या शाश्वत चेतनेमध्यें ती परम पुरुषास; भगवंतास धारण करते. अनन्यसाधारण शक्ति आणि अनिर्वचनीय सत्ता यांचें एकमेव आश्रयस्थान तीच एकटी आहे. जीं सत्यें प्रकट करावयाचीं असतात तीं स्वतः-मध्यें धारण करून किंवा ज्या परम गूढतेंत तीं लपलेलीं असतात त्या अवस्थेंतून त्यांना आवाहन करून ती त्या सत्यतत्त्वांना तिच्या असीम चैतन्याच्या प्रकाशामध्यें, खालीं आणते. आणि स्वतःच्या सर्वसमर्थशक्तीनें आणि अपार प्राणशक्तीनें त्यांना या विश्वामध्यें एकेक शक्तिरूप व मूर्त आकार प्रदान करते. पुरुषोत्तम तिच्याठायीं सनातन सच्चिदानंद रूपानें नित्यच अभिव्यक्त झालेला असतो; तिच्याच द्वारां विविध लोकांमध्यें, अद्वितीय असून ईश्वर-शक्तीच्या द्विविध चैतन्यरूपानें आणि पुरुष-प्रकृतीच्या द्वैत तत्त्वानें तो आविर्भूत झालेला आहे; समस्त भुवनें, विविध 'लोक', देवदेवता आणि त्यांच्या दैवी शक्ती यांच्यामध्यें तिनेंच त्या पुरुषोत्तमाला मूर्तरूप दिलें आहे; ज्ञात जगतांमध्यें आणि अन्य अज्ञात जगतांमध्येंहि जें कांहीं आहे ते सर्व तिच्याचमुळें साकार पावलें आहे. पुरुषोत्तमाबरोबर चाललेली तिची ही सारी लीला आहे; शाश्वत परम तत्त्वाचीं रहस्यें आणि अनंताची अलौ-किकता यांचा तिनें केलेला सारा आविष्कार आहे. तीच हें सर्व कांहीं आहे; कारण सर्वच

त्या दिव्य चित्-शक्तीचीं अच्छेद्य अंगें व अंश आहेत. तिनें जें ठरविलेलें आहे आणि ज्याला परमेश्वरानें अनुमति दिलेली आहे त्या व्यक्तिरिक्त इहत्र अथवा परत्र कांहींच अस्तित्वांत येऊं शकत नाहीं; परमेश्वराच्या प्रेरणेनें परिचालित होऊन ती जें दिव्यदृष्टीनें पहातें, आणि आपल्या सृजनानंदांत असतांना बीजरूपानें ती जें कांहीं निर्माण करते, त्या व्यतिरिक्त कांहींच या विश्वामध्यें नामरूप धारण करूं शकत नाहीं.

——श्रीअरविंद

(Mother मधन)

SABCL Vol 25 : The Mother Part 1 : Subpart 6

# आगमन

गुपित नाम धारण करून येणारी तूं कोण आहेस ?
सर्वत्र अधिराज्य गाजविणाऱ्या अंधःकारास जणुं पंख फुटावे;
अथवा सुप्त ज्वालेचें प्रखर अस्तित्व खदिरांगार-चक्षूंनीं एकाकी भासवावें,
किंवा विश्वाला विस्मृति पडलेल्या आदित्यानें कालरात्रीच्या भीषण काळोखांतून
आपल्या दिव्य-रश्मींचे विस्मायक स्रोत नभोभागावर उधळावे;
——तसें तुझें हें आगमन आहे.
तुझ्या प्रभावामुळें, पराजित झालेल्या हृदयानें
विषयवासनांचे पीळ नि कामावेशांचे सारे तणावे तोडून
स्वतःला सुखेनैव तुझ्या हातीं सुपूर्त केलें आहे;
——आणि या हृद्वीणेंतून आतां स्वच्छंद दैवी
लहरींचें सुमधुर निनाद उमटलेले ऐकूं येत आहेत.

(श्रीअरविंदांच्या 'Who art Thou that comest' कवितेच्या आधारें)

Sri Aurobindo Collected Poems : Page 109

# वाचकांचे प्रश्न

**(वाचकांनीं आपापले प्रश्न पाठवावेत)**

(श्रीअरविंदांच्या तत्त्वज्ञानामधील कांहीं मुद्यांवर घेतलेले कांहीं आक्षेप आमच्यासमोर आहेत. हे मुद्दे, मूळ ग्रंथाच्या अध्ययनानंतर नव्हे, तर श्रीअरविंदांच्या तत्त्वविचारासंबंधीं लिहिलेल्या एका ग्रंथाचें परीक्षण करतांना एका अभिप्राय-लेखकानें[1] उपस्थित केलेले असले तरी त्यांचें स्वरूप तात्त्विक असून जीवनविषयक मूलभूत स्वरूपासंबंधीं कांहीं महत्वाचा विचार दर्शित करणारे ते असल्यानें आम्ही त्यांचा येथें विचार करण्याचें योजिलें आहे.)

**प्रश्न :—श्रीअरविन्द म्हणतात, श्रीरामचंद्राची जाणीवेची भूमिका पूर्ण विकसित मानवाच्या श्रेणीची होती व श्रीकृष्णाची भूमिका दिव्य होती. याचा अर्थ श्रीअरविंद श्रीरामचंद्रास अवतार मानीत नाहींत असा होतो. नव्हे कां ?**

**उत्तर** :—असा अर्थ बिलकूल नाहीं. कारण प्रथम, अवतार म्हणजे तरी काय ? सृष्टीमध्यें जी उत्क्रांति होत आहे तिच्या प्रगतीला मदत करण्यासठीं विशेष हेतूनें ज्यावेळीं या जगतामध्यें भगवत्-शक्तीचें 'अवतरण' होतें, तेव्हां त्याला अवतार म्हणावयाचें. क्रमाक्रमानें उच्च उच्च पातळीवर प्रकृतीचें आरोहण चाललें असतां, या विकसनशील प्रकृतीच्या मध्यवर्ति चेतनेला ज्याठिकाणीं निर्णायक स्वरूपाचें वळण द्यावयाचें असतें त्याठिकाणीं तिला विशेष मदतीची जरूरी असते; त्या त्या पातळीवर सामान्यतः उपलब्ध असलेल्या शक्तीपेक्षां उच्चतर शक्ति व प्रेरणा देऊन, तिला अधिक उच्च पातळीवर चढविण्याची आवश्यकता असते. त्या त्या विशिष्ट काळाच्या आवश्यकतेनुरूप चेतनेच्या विशिष्ट पातळीवर व विशिष्ट स्वरूपांत या उच्चतर शक्तीचें झालेलें **अवतरण**, म्हणजेच अवतार असें आम्ही म्हणतो. अशाप्रकारें जीवनाच्या एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत, एका पातळीवरून दुसरीवर स्थित्यंतर अथवा संक्रमण होतांना त्या प्रत्येक पायरीवर उदाहरणार्थ, जलचर प्राणीकोटीनंतर भूजलचर प्राणी जेव्हां निर्माण झाले तेव्हां किंवा नंतर संपूर्ण भूचरप्राणी उत्पन्न झाले त्यावेळीं अथवा त्यांतून नृसिंहासारखे अर्धपशु-अर्धमानव झाले, त्या प्रत्येक संक्रमण काळामध्यें परमेश्वराचा नूतन आविष्कार झालेला आहे, एकेक अवतार झाला आहे. हें आपल्या भारतीय परंपरानें मानलेल्या दशावतारावरून दिसून येतें. मानवप्राणी निर्माण झाल्यानंतरहि, मनुष्य जातीच्या एकेका संक्रमणावस्थेनंतर, मनुष्याची चेतना एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर चढत असतांनाहि असेंच घडलेलें आहे. विकासक्रमामध्यें प्रकृतीला प्रत्येक पायरीवर ही जी एक जणुं उडी घ्यावयाची असते, तीसाठीं आवश्यक ती चेतना आणि शक्ति त्या त्या देवावतारामध्यें प्रकट होते. परमेश्वर सर्वशक्तिमान् असूनहि, हेतुपुरस्सर मर्यादित बंधन घेतल्यानें त्या काळाला आवश्यक तेवढेंच दिव्यत्व त्या अवतारामध्यें व्यक्त झालेलें दिसतें.

अशारीतीनें, जगाच्या इतिहासांतील अशा कालखंडांत श्रीरामचंद्र अवतरले कीं, ज्यावेळीं

---

[1] ५ जानेवारी १९५८ 'केसरी'.

वासनाधिष्ठित अहंकार व त्याच्या प्रेरणा यांच्या वर्चस्वांतून, **'राक्षसा'**च्या मगरमिठींतून व पाशवी मनाच्या असमतोल प्राबल्यांतून **'वा-नर'** अवस्थेंतून बाहेर पडून वर चढण्यास मनुष्य-प्राण्यास मदत करण्याची आवश्यकता होती; बुद्धीचा प्रकाश आणि सत्ता, मनाची सुसंस्कृतता, भावनांची कोमलता व आदर्श ध्येयवाद यांच्या प्रभावास उन्मुख व उत्सुक असलेल्या चेतनेच्या पातळीवर, **सात्विक मनाच्या** पातळीवर मानवजातीस नेऊन सोडावयाचें होतें. त्या काळापर्यंत पार्थिव जीवनांत अज्ञात असलेली ही चेतना श्रीरामामध्यें मूर्तरूप झाली. अत्यधिक आसुरी अहंकार आणि पाशवी किंवा दैहिक इंद्रियसुखप्रधान मनोवृत्ति यांच्या अधि-राज्यांतून मानवाला सोडवून जीवनांत सात्विक-मनाची सत्ता स्थापन करण्याकरितां श्रीराम-चंद्रांचा प्रयत्न होता आणि त्यांत ते यशस्वीहि झाले. त्यांचें अवतारकार्य हेंच होतें; आणि त्यांच्यापूर्वीं होऊन गेलेल्या चेतनेच्या खालच्या पातळीवरील किंवा त्यानंतरच्या उच्च पातळी-वरील अवतारांनीं जसें आपापलें कार्य यशस्वीरीतीनें पार पाडलें, तसेंच श्रीरामचंद्रांनींहि आपलें अवतारकार्य पार पाडलें, हें उघड आहे.

*

**प्रश्न :—उच्च आध्यात्मिक पातळीवर चढलेल्या व्यक्तींची पुरेशी संख्या झाली म्हणजे पृथ्वीवर देवाचें राज्य सुरूं होईल, पृथ्वीचाच वैकुंठ बनेल, असें म्हणतांना 'पृथ्वीवर स्वर्गाचें राज्य होईल' ही ख्रिस्ति कल्पना श्रीअरविंद मान्य करतात; पण असें घडणें असंभवनीय आहे. कारण तसें झाल्यास सर्व कांहीं ब्रह्मस्वरूपीं लीन होऊन जाईल, सृष्टीचा प्रलय होईल. हें असें घडणें सृष्टिरचनेच्या मागें असलेल्या हेतूच्या आणि सृष्टीच्या भेदप्रधान स्वरूपाच्या विरुद्ध आहे; कारण सृष्टि म्हणजे विषमता.**

**उत्तर** :—पृथ्वीवर स्वर्गाचें राज्य अवतरण्याची ख्रिस्ति कल्पना आणि पृथ्वीवर दिव्य जीवनाच्या स्थापनेचें श्रीअरविंदांना झालेलें दिव्य दर्शन, यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. मानवाची पराकाष्ठेची नैतिक शुद्धि करून, धार्मिकतेची भावना जोपासून आणि जाणीवेच्या सामान्य पातळीवरील मलीनता व दाढर्य नाहींसें करून **सात्त्विक मनाच्या** विशुद्धतर शिखरा-पर्यंत मनुष्याला उन्नत केलें म्हणजे, त्याचा परिणाम म्हणून, जगाच्या स्वरूपांत बदल घडून येईल असा ख्रिस्त लोकांच्या कल्पनेचा अर्थ आहे. परंतु मनुष्याच्या जाणीवेचें प्रत्यक्ष केंद्रच मनस्तत्त्व आणि त्याच्या द्विधा प्रवृत्ती, यांच्या अगदीं वर उचलून तेथें स्थिर केल्याशिवाय आणि मनस्तत्त्वाहून उच्चतर चेतना, विज्ञान व संकल्प यांची परमोच्च शक्ति पृथ्वीवर कार्य-कारी केल्याशिवाय, कोणत्याच प्रकारचा आमूलाग्र बदल मानवतेच्या जीवनांत घडवून आणतां येणें शक्य नाहीं, अशी श्रीअरविंदांच्या पृथ्वीवरील दिव्य जीवनाच्या कल्पनेमागील भूमिका आहे. त्यावरून हें ओघानेंच येतें कीं, कितीहि लोकांना जरी वैयक्तिक मुक्ति प्राप्त झाली आणि ते ब्रह्मपदीं पोंचले,—तसें पाहिलें तर आतांपर्यंत अशा व्यक्तींची संख्या कितीतरी मोठी होऊन गेली आहे—तरी त्यामुळें ही विश्वव्यापी समस्या सुटणार नाहीं; तर मनस्तत्त्वा-हून उच्चतर असलेल्या ह्या अतिमानसाचें (Supermind), ह्या नूतन शक्तिकेंद्राचें अव-तरण होण्यानेंच ही समस्या सुटणार आहे.

ही अतिमानसिक शक्ति सुप्रतिष्ठित होऊन तिची पृथ्वीवर सत्ता सुरूं झाली म्हणजे त्या-

चा परिणाम म्हणून जें पूर्णत्व प्राप्त होईल त्याचें स्वरूप असें असेल—परमेश्वरी ऐश्वर्याचा येथें संपूर्ण आविष्कार होईल; या विश्वामध्यें, या पार्थिव जीवनामध्येंहि दिव्य ज्ञान, दिव्य संकल्प-शक्ति, सुसंवाद आणि आनंद यांचें संपूर्ण विकसन होईल. हें पूर्णत्व म्हणजे स्वर्गलोकाची, उच्चतर 'लोकां'ची व त्या त्या पातळीवरील त्यांच्या परिपूर्ण जगताची लघु-आवृत्ति अथवा पुनरावृत्ति नव्हे. श्रीअरविंदांच्या मतानें, त्याच प्रकारच्या सृष्टीची अन्यत्र पुनरावृत्ति करण्या-मध्यें कांहींच अर्थ उरणार नाहीं. पृथ्वीवरील 'वैकुंठा'मध्यें मूळ वैकुंठापेक्षां निश्चितच कांहीं तरी अधिक असेल. अतिमानस 'विज्ञाना'चीं सर्व सत्यतत्त्वें आणि सर्व शक्ती येथें कार्यकारी होतील; विकसनशील उत्क्रांतीच्या क्षेत्रांतहि तीं प्रकट होतील, आणि त्यामुळें खऱ्या अर्थानें 'वैकुंठा'ची परिपूर्णता साधेल.

अशारीतीनें विविधतापूर्ण, भेदप्रधान सृष्टीचा विलय होऊन ब्रह्माची निरवयव एकताच केवळ शिल्लक राहील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. उलटपक्षीं, सृष्टींतील अनेक-त्वाला, विविधतेला खराखुरा अर्थ प्राप्त होईल आणि 'एक रूपाचें' बहुविध वैभव सर्वांगांनीं व्यक्त होईल.

★

**प्रश्न :—श्रीअरविंदांनीं मानलेली, मानवाच्या द्विविध आत्म्याची कल्पना, अशास्त्रीय व चूक आहे. परमात्मा व जीवात्मा यांतहि अभेद मानणाऱ्या अद्वैत मताच्या ती विरुद्ध आहे. जडतत्त्वासह सर्व कांहीं ब्रह्मरूपच आहे, 'सर्वं खलु इदं ब्रह्म', असें उपनिषदांप्रमाणेंच जर श्रीअरविंद प्रतिपादन करतात, तर मानवाच्या आत्म्यामध्यें हें द्वित्व कोठून आलें ?**

**उत्तर** :—श्रीअरविंदांनीं 'वासनात्मा' आणि खरा आत्मा हा जो फरक केलेला आहे तो विकासमार्गावरील व्यक्तीच्या अस्तित्वाच्या घटनेमध्यें आढळून येणाऱ्या एका अनुभूत सत्यावर आधारलेला आहे. खरा आत्मा, जीवात्मा हा परमेश्वराचाच एक अंश, स्फुल्लिंग असून तो मानवाच्या अस्तित्वाच्या गूढतम भागांत वसत असतो. सामान्यतः मनुष्याला या खऱ्या आत्म्याचें भान असत नाहीं. मनुष्याला जाणीव असते 'अहं' ची. या 'अहं' भोंवतीं व्यक्ति-मत्त्वाच्या सर्व अंगांची रचना होत असते. तेंच त्याच्या अस्तित्वाचें केंद्र, असें तो मानत असतो. वासनेच्या प्रेरणाशक्तीनें तो वाढत असतो. माणसाचें मन, प्राण व देह यांच्या क्रियांवर सामान्यतः या वासनामय अहं चें प्रभुत्व व मार्गदर्शन असतें. ज्यावेळीं आपली सदा बहिर्मुख असलेली दृष्टि आंत वळवून आपण अंतर्मुख होऊं लागतो, त्यावेळीं आपल्या सर्वच जीवन-व्यापारांना, क्रियांना मागें राहून आधार देणारा 'खरा आत्मा', 'जीवात्मा' आपल्या 'हृदय-गुहे' मध्यें निगूढ-भागीं वसत असल्याची जाणीव आपणांस होऊं लागते.

अर्थात् वरवर, पृष्ठभागावरून व्यक्तीच्या कृतींना प्रेरणा देणारा 'वासनामय आत्मा' व हा 'शुद्ध' आत्मा, 'जीवात्मा' हे कधींच एक असूं शकणार नाहींत, हें उघड आहे. विकसन-शील मनुष्याच्या विविधमुखी प्रेरणा व शक्ती यांचें केंद्रीकरण करण्याकरतां व त्यांना सहेतुक मार्गदर्शन करण्याकरतां प्रकृतीनें योजलेली एक क्लृप्ति, एक महत्वाची क्लृप्ति, एक महत्वाचें साधन, एवढेंच या पृष्ठभागीं असणाऱ्या वासनामय 'अहं' चें स्वरूप आहे. हें खरें कीं, मानव

देह, प्राण व मन यांना जसा जीवात्म्याचाच शेवटीं आधार असतो, तसाच या वासनामय अहंलाहि त्याचाच अंतिम आधार असतो. त्याच्या आधारावर व संमतीवरच या वासनामय 'अहं'चें अस्तित्व अवलंबून असतें. या अर्थानें 'वासनामय अहं' हाहि जीवात्म्यापासूनच उद्भवलेला असतो असें म्हणतां येईल. पण या 'अहं' ची निर्मिति, तात्पुरती, कामापुरती केलेली असते; तर अंतस्थ 'जीवात्मा' हा भगवंताचा मानवाच्या ठिकाणचा शाश्वत अंश असतो.

हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं हा वासनामय अहं अथवा 'वासनात्मा' म्हणजे उपनिषदें व अन्य शास्त्रग्रंथ यांनीं उल्लेखिलेला 'आत्मन्' नव्हे. व्यक्तीचा आत्मन्, 'जीवात्मा' हा कधीं विकसनक्रमांत गोंवलेला नसतो; तो त्यापासून अलिप्त असतो, दूरस्थ असतो व तोच त्याचा अधिष्ठाता असतो. जीवात्म्याचा एक प्रतिनिधिरूप भाग, चैत्यपुरुष हा प्रत्यक्ष विकासक्रमांत शिरतो, स्वतःला त्यामध्यें गोवून घेतो. मन, प्राण व शरीर या त्रयींच्या द्वारां व्यक्तीच्या विकसनास साहाय्य करीत असतां तो स्वतःहि वर्धमान होत असतो. प्रत्येक जन्मांतील अनुभवांचें सार आत्मसात् करीत करीत त्याला एक व्यक्तिमत्व प्राप्त होत असतें. तें व्यक्तिमत्व आणि पुरेसें सामर्थ्य प्राप्त होईपर्यंत आणि पडद्यापाठीमागून पुढें येऊन त्यानें आपल्या हातीं सूत्रें घेण्याचें नियोजित कार्य करीपर्यंत 'अहं' हा मंत्र्याचें, मार्गदर्शक मध्यस्थाचें काम करीत असतो. चैत्य-पुरुष पुढें येऊन विकासक्रमाचें नेतृत्व करूं लागला म्हणजे 'अहं' चें काम संपतें, तो आपोआप गळून पडतो.

या दृष्टीनें पाहिलें असतां त्या एकमेव 'आत्मन्' मध्यें दोन खंड मानण्याचा प्रश्नच उरत नाहीं. 'आत्मन्' हा नेहमींच केवल आणि एकमेव, अखंड असतो; सृष्टीच्या आविष्काराच्या विविध गतींपासून अलिप्त असतो. तरीपण या कारणामुळें हा आविष्कार कांहीं कमी सत्य किंवा कमी दिव्य ठरत नाहीं. 'गति'मानता आणि 'स्थिति'मानता, दोन्हींहि 'एका'चीच रूपें, अवस्था असल्यानें दोन्हींहि सारखीच दिव्य आहेत. 'एकोऽहं' मधून निर्माण झालेलें अभिव्यक्तींतील 'बहु' त्व हें त्या 'एकं' इतकेंच सत्य आहे. 'सर्वं खलु इदं ब्रह्म', होय; सर्व कांहीं ब्रह्मच आहे. सर्व वस्तूंचें सार पहातां, सर्व कांहीं ब्रह्म आहेच; परंतु प्रकृतीमधील नाना आकार प्रकार व रचना ह्या केवळ तात्पुरत्या व तात्कालिक स्वरूपाच्या असून ह्या महासागरप्राय अभिव्यक्तीच्या अणुरेणूंतहि ईशदर्शन घडविणें, हा प्रकृतीच्या विकासक्रमाच्या खटाटोपाचा उद्देश आहे; ह्याचा ग्रहणशील बुद्धीला बोध झाल्यानंतर, अवघें स्थिरचर म्हणजेहि आविष्कृत झालेलें ब्रह्मच आहे, असा साक्षात्कार मनुष्यास होऊं शकेल.

—रेवान्

# साहित्य-सत्कार

**माऊली** :––(मासिक, 'तुका झालासे कळस' विशेषांक, संपादक–श्री० आप्पासाहेब चव्हाण व श्री० केशवराव सासने. २२२ सदाशिव. पुणें. २)

ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदास या तीन थोर विभूतींच्या प्रभावानें व प्रसादानें महाराष्ट्राची आध्यात्मिक अस्मिता अद्यावधि जागृत आहे, जिवंत व ज्वलंत आहे. ज्ञान-भक्ति-कर्माच्या या तीन मूर्त प्रतीकांनीं मराठी देशाचें वैचारिक आकाश, त्याची भावगंगा आणि त्याची कर्म-भूमि आपल्या अमोघ तपोबलानें इतकी कांहीं भारून टाकलेली आहे कीं त्यांची मधुस्रवा वाक्सुधा पुनः पुनः प्राशन करून सुद्धां फिरून फिरून नवीन प्याले भरावेसे वाटावेत, 'माऊलीचा 'तुका झालासे कळस' हा आकर्षक व सुंदर विशेषांक वाचल्यावर कांहींतरी नवीन प्राप्तीचा आनंद प्रत्येक श्रद्धावंताला होतो याचें कारण तरी हेंच. ३०४ पानांच्या या अंकाचें बाह्य-दर्शन जसें भावपूर्ण, चित्रमय एवं आकृष्ट, तसेंच थोर वैष्णवभक्तांच्या व नामवंत साहित्यि-कांच्या विविध लेखमालांनी त्याचें अंतरंगहि सुशोभित व गौरवान्वित झालेलें आहे असेंच कोणीहि खात्रीनें म्हणेल. किंबहुना संतश्रेष्ठ तुकारामाच्या जीवनाचा जो अनेकविध परामर्ष एका नव्या प्रकाशांत घेतलेला यांत आढळतो, आणि ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, जनाबाई, कबीर इत्यादि संतश्रेष्ठांना सुद्धा जी आदरांजलि वाहिलेली दृष्टीस पडते तो परामर्ष व ती आदरांजलि नाविन्यपूर्ण नाहीं असें कोण म्हणेल? डॉ. विनोदांची 'पश्यन्ती', पंडित सातवळे-करांचें 'कळसामधील तत्त्वज्ञान', डा. वि. म. भटांची 'ब्रह्मसाम्राज्यदीपिका', तसेंच श्री. गुलाब-राव महाराज, प्रा. तगारे, तात्यासाहेब करंदीकर, श्री सूर्यवंशी, श्री. नातू, प्रा. आवळीकर इत्यादि विचारवंतांचे लेख जिज्ञासू प्रकृतीच्या वाचकांना खात्रीनें उद्बोधक ठरतील.

'तुका म्हणे मी तो अवघाचि विराळो
विठ्ठलचि झालो दर्शनानें।'

अशा प्रकारची उच्चावस्था प्राप्त करणाऱ्या संतश्रेष्ठ तुकारामाला श्रद्धापूर्वक अभिवादन कर-णारी 'माऊली' प्रकाशन संस्था अभिनंदनास व प्रशंसेस पात्र आहे खरेंच.

**सुखी जीवन** :––(बाल विभाग.) ले. वैद्यराज श्री० दत्तात्रेयशास्त्री जळूकर. आयुर्वेद विशारद. प्रकाशक :––स्वाध्याय मंडळ. पारडी (सुरत) किं. ६५ न. पै. पृष्ठें. ७८.

बालकांचें जीवन कसें सांभाळावें ह्याचा आयुर्वेदीय दृष्ट्या महत्वपूर्ण विचार या पुस्त-कांत केला आहे. बालकाचें सुसंवर्धन करण्याकरतां प्रत्येक मातेनें तें संग्रहीं ठेवण्यासारखें आहे.

**विद्यार्जनाचा संस्कार** :––(ले० विद्यावाचस्पति श्रीराम गोसावी कि. १२ आणे. पृष्ठें-५५ प्रकाशक :––वि० म० सुवर्णपाटकी. 'गणेश महादेव प्रकाशन. 'मधु-मुकुंद'. सायन. मुंबई२२)

विद्यार्जनाच्या म्हणजेच मौंजीबंधनाच्या संस्काराचें महत्त्व, तदनुषंगिक निरनिराळे विधी, उपनयनांतील गणवेष इत्यादींचा बाह्य व गूढ अर्थ, तसेंच संध्योपासनेची सांगोपांग माहिती देऊन लेखकानें विशेषतः आजच्या काळांतील तरुण पिढीला चांगलेंच मार्गदर्शन केलें आहे. उपनयनाचे व संध्यावंदनाचे मूळ संस्कृत मंत्र आणि त्याचा मराठी रसाळ अनुवाद स्फूर्ति-दायक आहे.

**सुप्रजानिर्माणसंस्कार**––(ले० पं. देवकृष्ण केशव पंडित तथा आण्णाशास्त्री मुल्हेरकर. किं. ७५ न. पै. पृष्ठसंख्या ६८. 'गणेश-महादेव 'प्रकाशन.)

वैदिक संस्कारपद्धतीचें व विवाहसंस्थेचें लेखकानें सर्वतोपरी समर्थन केलें आहे. तें उद्बोधक असलें तरी विवाह वयोमर्यादा, स्त्रीपुरुष समानहक्क इत्यादींच्या विवेचनाविषयीं अनेक वाचकांचें लेखकाशीं दुमत होण्याचा संभव आहे.

**भर्तृहरिकृत सार्थ नीतिशतक**––(ले० पं. वासुदेवशास्त्री बागेवाडीकर. विक्रेते––दि न्यू पूना बुक डेपो. ५३६ शनिवार. पुणें-२. पृष्ठसंख्या ७८, किं. १ रु० २५ न. पै.)

संस्कृत श्लोकांचा अन्वय, मराठी समश्लोकी व कठीण शब्दांचे अर्थ यांमुळें सामान्य वाचक व विद्यार्थी-वर्ग यांना पुस्तक अत्यंत उपयुक्त व सुबोध झालें आहे.

**दुर्गास्तोत्रम्** (संस्कृत)––(श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी. किं. २५ न. पै.) श्रीअरविंदांनीं प्रथम बंगालीमध्यें लिहिलेल्या दुर्गास्तोत्राचा संस्कृत गद्य व पद्य अनुवाद. श्रीअरविंद व श्रीमाताजी यांचा एकेक फोटोहि त्यांत घातलेला आहे.

**संस्कृत भवितव्यम्** (संस्कृत)––उपनिषत्कथा-विशेषांक
(वर्ष ७ वें. अंक ३०. किं. ५० न. पै. संस्कृत भाषा प्रचारिणी सभा. नागपूर.)

भारताच्या गीर्वाणवाणीचा प्रचार करण्याचें व तरुण पिढीमध्यें तिची अभिरुचि निर्माण करण्याचें कार्य 'संस्कृत भवितव्यम्' आपल्या शक्तीनुसार करीत आहे. या विशेषांकांत प्रमुख दशोपनिषदांतील कथा सोप्या भाषेंत लिहिल्या आहेत आणि उपनिषदांतील कांहीं प्रार्थनारूप शांतिपाठ सुरुवातीस जोडले आहेत. संस्कृतप्रेमींना आणि विशेषतः विद्यार्थीवर्गाला हा संग्रह उपयुक्त झाला आहे.

**पांचजन्य** :––(गुजराथी) ले० पूजालाल, श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी. प्रकाशक : प्रगति साहित्य मंदिर खपाटिया चकला. सुरत. पृष्ठ सं० ७६. किं. १ रु. ८ आ०)

या वीररसानें ओथंबलेल्या काव्यसंग्रहानें गुजराथी वाङ्मयांत एक अमोलिक भर टाकली आहे.

*1*) **Lights on the Tantras** — By M. P. Pandit. (Publishers : Ganesh & Co. (Madras) private Ltd. Madras-11) Price Rs. 3.

वेदांचें श्रेष्ठत्व अथवा उपनिषदांतील ज्ञानभांडार यांची महति नेहमीं गायली जाते; पण भारतीय संस्कृतीच्या आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रांत तंत्रशास्त्रानें किती अमोल भर टाकली आहे हें आपण लक्षांत घेत नाहीं. एवढेंच नव्हे तर, तंत्रशास्त्र म्हणजे जादुटोणा, चेटुक-विद्या, अथवा अनिर्बंध विषयोपभोग यांचें शास्त्र, असा सामान्य जनांचा समज झालेला दिसतो. गैरसमज आणि अज्ञान यांनीं झांकोळलेल्या अशा या विषयावर, त्याच्या मूलभूत सिद्धांतांवर श्रीअरविंदांच्या दृष्टिकोनांतून लेखकानें प्रकाश टाकला आहे.

परंपरागत ज्ञानधनाचें रक्षण आणि त्याचें नूतन संस्करण करून तें समाजाच्या सर्व थरां-पर्यंत पोहोंचविण्याची तंत्रशास्त्रानें केलेली कामगिरी अपूर्व आहे. वेदांतील गूढ आध्यात्मिक साधनाप्रकार जतन करून त्याला शास्त्रीय स्वरूप देण्याचें कार्य तंत्रशास्त्रानेंच केलेलें आहे. या जड जगतामध्येंहि दिव्यत्वाचा आविष्कार घडवून आणण्याचें महान् उद्दिष्ट, त्याच्या परि-पूर्तीसाठीं 'आद्या शक्ती' चें आवाहन करण्याची आवश्यकता आणि त्या दृष्टीनें उत्कृष्ट कार्य-

कारी साधन म्हणून मानव व्यक्तीचें मानलेलें महत्व——या तंत्रशास्त्राच्या सारभूत तत्त्वांचें स्थान भूतकालाप्रमाणेंच भविष्यकालीन सर्वसमन्वयात्मक विश्वधर्मामध्येंहि अढळ आहे, हें लेखकानें दिग्दर्शित केलें आहे. तंत्रशास्त्राचीं मूलतत्त्वें आणि साधना यांचें प्राथमिक पण सांगोपांग ज्ञान होण्याच्या दृष्टीनें तंत्रशास्त्राचें चार पाद, कुंडलिनी योग, अधिकारी गुरुची आवश्यकता, मंत्रोच्चाराचा प्रभाव, देवदेवतांचे साहाय्य, साधकांचें वर्गीकरण, उपासनेची विविध अंगें इत्यादींचें सविस्तर विवेचन आणि 'रहस्य पूजा' किंवा 'लता साधना' या विरुद्ध घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचें सप्रमाण खंडण, वाचकांचा त्या विषयींचा वैचारिक संभ्रम दूर करण्यास समर्थ आहे.

आध्यात्मिक मार्गावरील साधकांस आणि विशेषतः तंत्रशास्त्राविषयीं जिज्ञासा बाळगणाऱ्या सामान्य वाचकांसहि, अधिकारी व्यक्तीच्या प्रभावी लेखणींतून उतरलेली ही वाक्-सरिता ज्ञानतृष्णा शमविणारी आणि साधनेस उत्तेजन देणारी निश्चित आहे.

*2)* **Slokas of Guru Teg Bahadur :**— Price 35 N. P.

*3)* **Guru Nanak :**— Price 40 N. P.

By Harkrishna Sing, Publishers. — Sri Aurobindo Yoga Mandir. **UNA** (Punjab.)

## Shlokas of Teg Bahadur

शीख लोकांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथांतील शेवटच्या भागांतील मूळ पंजाबी ओव्यांचा हा इंग्रजी काव्यानुवाद आहे. परमेश्वराच्या साक्षात्कारासाठीं धार्मिक विधी आणि क्रियाकांड यांच्या अवडंबराची आवश्यकता नाहीं; भक्ताची तळमळ आणि भक्तिभाव यांसाठीं देव भुकेला आहे, म्हणून बाह्य क्षणभंगूर सुखप्राप्तींत वेळ न घालवितां देवाची कांस धरावी हें या श्लोकांचें सार आहे. श्लोकांची भाषा सुलभ आणि भाव हृदयस्पर्शी आहे.

सबंधच ग्रंथसाहेबाचा इंग्रजी काव्यानुवाद करण्याचा मानस लेखकानें प्रस्तावनेंत व्यक्त केला आहे. त्यांत आम्ही लेखकाला सुयश चिंतितों.

## Guru Nanak

अध्यात्म विषयाची गोडी असणाऱ्यांना, 'गुरु नानक'——प्रकाश व प्रेम यांचा प्रेषित. हें गद्य-पद्यात्मक लहानसें चरित्र स्फूर्तिप्रद आहे. यांत कोठें पाल्हाळ वा भोळेपणाचा भाबडा भाव वाचकांस आढळणार नाहीं. हिंदु मुसलमानांत निर्माण झालेला तीव्र संघर्ष दूर करून त्यांना एकत्रित आणण्याचें महान् कार्य या संताच्या हातून कसें घडलें याचें दिग्दर्शनहि यांत आहे. लेखकानें शीखांच्या दहाहि गुरूंचीं चरित्रें अशातऱ्हेनें लिहावींत असें सुचवावेसें वाटतें.

# दिव्य-जीवन

## ग्रंथ-प्रकाशन-योजना

श्रीअरविंदांच्या Life Divine या अमोलिक महान् ग्रंथाचा सुबोध मराठी अनुवाद सेनापति पां. म. बापट यांनीं पुरा केला असून त्याचें प्रकाशन आम्ही हातीं घेत आहोंत. ग्रंथ दोन खंडांत प्रसिद्ध होईल. डेमी आकाराचीं सुमारें २००० पृष्ठें होतील. पहिला खंड एक वर्षांत छापून पूर्ण होईल. या ग्रंथाकरतां आगाऊ रक्कम भरणारांस **सवलतीनें रु० २५ मध्यें दोन्ही खंड मिळूं शकतील. टपाल खर्च वेगळा पडेल.** पुणें, नागपूर, नगर, मुंबई या ठिकाणच्या केंद्रांतून ग्रंथ नेल्यास ट. ख. पडणार नाहीं. ग्रंथप्रकाशनानंतर दोन्ही खंडांची किंमत पसतीस रुपये पडेल. तरी ग्राहकांनीं खालील पत्त्यावर अथवा आमच्या सहीची पावती-पुस्तकें घेऊन येणाराजवळ पैसे भरून आगाऊ नांवें नोंदवावींत.

आमच्या या प्रकाशनकार्यास महाराष्ट्र-जनता संपूर्ण पाठिंबा देईल असा **विश्वास** आहे.

**पुणें-विभाग**
**श्री. डॉ. य. वि. फाटक**
**एम् डी**
**३३।३२ एरंडवणा, पुणें-४**

**व्यवस्थापक**
**भा. द. लिमये**
**संजीवन कार्यालय**
**श्रीअरविंद आश्रम पांडीचेरी**